१०८ इतिहास

श्री स्थान मः
करवीर व संकेश्वर

इति



श्री

चीयते बालिशस्यापि सत्क्षेत्र पतिता कृषिः॥
न शालेः स्तंबकरिता वप्तुर्गुणमपेक्षते॥

विशाखदत्तः

प्रस्तुतच्या शांततेच्या एक छत्री राज्याचे छायेंत दिवसानुदिवस सर्व गोष्टींत सुधारणा ह्मणून होत आहे, त्यांत देश भाषांनी ही सुधारणा व अभिवृद्धि व्हावी ह्याकरितां [illegible]हुस्थांचे परिश्रम चालले आहेत; देश भाषेच्या [illegible] जाग झाल्यामुळें वाचक मंडळी वरचेवर तया[illegible]त आहे व छापखान्याच्या कलेच्या योगानें पुस्तकें ही [illegible]न तयार होण्यास उशीर नाहीं, तेव्हां वर्तमान पत्रें, मासि[illegible] पुस्तकें, कादंबऱ्या, नाटकें, प्रहसनें इत्यादिकांचा सुकाळ झाला यांत नवलतें काय? आतां नाटकें, कादंबऱ्या इत्यादि केवळ कर्मणुकीच्या पुस्तकांपासून वाचनाची गोडी उत्पन्न होते, हें कांहीं अंशीं खरें, परंतु तशा पुस्तकापेक्षां, कांहीं मनोरंजन होऊन कांहीं जास्ती माहिती ही वाचकांस व्हावी, अशा तऱ्हेचीं पुस्तकें असतील तरतीं बरीं असें पुष्कळ सुज्ञ लोकांचें मत आहे. पण तशा प्रकारचीं पुस्तकें हल्लीं ह्मटलीं तर "काव्येतिहास संग्रहांत" ज्या बरवरी छापून येतात, त्यावांचून दुसरीं स्वतंत्रतेनें तयार होऊन निघालेलीं फारशीं नाहींत, असें ह्मटलें तरी हरकत नाहीं. इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें झालेलीं मात्र कांहीं सांपडतील; पण तशा पुस्तकांत "ही आंभ[illegible]चें धर्म संबंधीं इतिहासाचें पुस्तक कांहीं कोठें दृष्टीस पडलें

नाहीं. धर्म हा मनुष्य मात्रास अत्यावश्यक आहे, असें सर्व प्रकारचे लोक आजपर्यंत मानीत आले आहेत. आफ्रिका,अमेरिका वगैरे खंडांतले अगदीं रानटी लोक जरी घेतले ;तरी त्यांना ही कांहीं ना कांहीं तरी धर्म म्हणून आहेच, त्यांचा गुरु ह्मणून आहेच. इतर पाश्चात्य राष्ट्रांत तर या महत्वाचे विषया संबंधीं अनेक इतिहास मोठ मोठ्या अनेक विद्वान् गृहस्थांनीं फार परिश्रम करून लिहिले आहेत. सुधारणेच्या शिखरास पोंचलेले जे आमचे सार्वभौम त्यांचा धर्मावर किती कटाक्ष आहे, हें सर्वांस माहीत आहे. धर्माध्यक्षाचा मान तिकडे मोठा असतो. उत्पन्नाचा नियमित अंश धर्म खात्याकडे खर्च करावयाचा असा कायदा आहे. फार तर काय पण नवीन राजा जेव्हां गादीवर बसतो, तेव्हां त्याला देखील "मी प्रॉटेस्टंट धर्माचें पालन करीन" अशी शपथ वहावी लागते, तेव्हां राज्य पद मिळतें!! सारांश " नजातु कामान्न भयान्न लोभाद्ध र्मं त्यजेज्जीवितस्यापि हेतोः" "सुखंच न विना धर्मात्तस्माद्धर्म परोभवेत्" इत्यादि वाक्यां मध्यें आमचे पूर्वजांनीं जें धर्माचें महत्व प्रतिपादिलें आहे, त्याची सत्यता सर्व कालीं व सर्व देशीं अबाधित दृष्टीस पडत आहे, तेव्हां इतका महत्वाचा जो धर्म त्याच्या स्थापन विषयीं ज्यांनीं आपलीं आयुष्यें खर्च केलीं त्यांचें महत्व काय सांगावें?

आमचे देशांत श्रीमच्छंकराचार्यांचा अवतार होऊन, सर्व ठिकाणीं वैदिक मार्गाची प्रवृत्ति त्यांनीं केली व चोहोंकडे आपले मठ स्थापिले; त्या आचार्यांच्या मताचे आम्ही ह्मणवि

तों व प्रस्तुत श्री **संस्थान करवीर व संकेश्वर** ह्या मठाचे आज्ञेंत वागतों पण आचार्यांबद्दल आपणाला कांहीं माहिती नाहीं व ह्या मठाचा संबंध आचार्य परंपरेला कसा मिळाला हें ही आपणाला ठाऊक नाहीं; असा विचार मनांत येऊन मी संकेश्वरीं आल्यावर संस्थानीं तपास घेऊं लागलों, तों सर्व जिज्ञासा पूर्ण होईना; तेव्हां मिळाली तितकीं शांकर विजयाचीं पुस्तकें, वंशावळी, सनदा, कैफीयती व वृध्दांची माहिती इत्यादि जितकें साहित्य मिळालें तितक्यावरून एक टिपण केलें. इतक्यांत **श्री स्वामी शृंगेरी** यांचें आगमन ह्या प्रांतीं झालें; तेव्हां ज्याला त्याला वरील माहितीची आवश्यकता वाटूं लागली व पुष्कळ लोकांत याविषया संबंधें चर्चा सुरू झाली. तेव्हां आपण जी माहिती मिळविली आहे, तिचा कांहीं तरी उपयोग होईल असें मनांत आणून सदर माहिती छापून प्रसिध्द करण्याचें धाडस केलें आहे. यांत जितक्या कसोशीनें खरी माहिती मिळवदली तितकी मिळविली आहे. तथापि विषय ऐतिहासिक व माझी अल्पबुध्दि असून हा प्रथमच प्रयत्न आहे, ह्यामुळें ह्यांत पुष्कळ न्यूनता राहिल्या असतील। तरी ज्या कांहीं आढळतील त्या काढून टाकून आरंभिलेलें काम तडीस पोंचविणें हें सज्जनाचें काम आहे, तें ते करतीलच!

यांत प्रायः जेथें कांहीं महत्वाची अशी गोष्ट वाटली तेथें त्याबद्दल टिपेंत आधार दाखविले आहेत. कालानुक्रम नीट लक्षांत येण्याकरितां, जेथें जेथें युधिष्ठिर शक, सु

रुसन वगैरे आले त्यानां शालीवाहन शकाचें रूप देऊन सर्वत्र शालीवाहन शकानेंच काळ दाखविला आहे. संस्थानचे इनाम गांवाबद्दल क्षेत्रफळ व उत्पन्ना सहित तक्ता आणि संकेश्वरबद्दल विशेष माहिती अशी शेवटीं पुरवणींत जोडली आहेत. तसेंच कित्येक स्तोत्रें या संबंधीं चांगलीं असून दुर्मिळशीं वाटलीं तींही शेवटीं लिहिलीं आहेत.

कित्येकांचा अभिप्राय, त्यांत आचार्यांबद्दल जी माहिती दिली आहे, ती अगदीं थोडी आहे. मंडन मिश्राशीं झालेला वाद, व्यासां बरोबर झालेला वाद, परकाया प्रवेश इत्यादि प्रकरणें सविस्तर त्यांत लिहावीं. पण आचार्यांबद्दल स्वतंत्र ग्रन्थच आहेत, तेव्हां त्या पुस्तकांत सर्व माहिती लिहिल्यापासून फारसा उपयोग होईलसें वाटलें नाहीं; शिवाय ग्रंथ विस्तार ही पुष्कळ होईल ह्मणून एथें संक्षिप्त हकीकत लिहिली आहे. तथापि बरेच लोकांचा जर वरील प्रमाणेंच अभिप्राय दिसला, तर ईश्वर कृपेनें दुसरी आवृत्ति निघाल्यास तींत इत्यंभूत वृत्तांत देतां येईल. सारांश यांत नवें कांहीं नसून जे जुने लेख होते, ते क्रमानें जुळविले आहेत ही यथाशक्ति केलेली सेवा सुज्ञ देश बांधवांस पसंत पडून उत्तेजन मिळेल तर पुढेंही अशी कांहीं सेवा करण्यास उमेद येईल.

त्या कामांत संस्थानांतील व बाहेरील ज्या ज्या गृहस्थानीं वेळोवेळीं मला हरएक प्रकारें मदत केली त्या सर्वांचा मी फार आभारी आहें. व प्रस्तुत वाचकांस ही अशी विनंति करितों कीं, यांत ज्या कांहीं न्यूनता त्यांस दिसतील त्या त्यांनीं कृ

पाकरून मला कळविल्यास, त्यांचा आदरपूर्वक स्वीकार करून त्यांच्या सुधारणे विषयीं अवश्य विचार करीन.

मिति कार्तिक वद्य १३ शके १८११ मुक्काम संकेश्वर. } ग्रंथ कर्ता.

इ.जं.हे.जं. ११९०

# संस्थान मठ करवीर व संकेश्वरचा इतिहास

ह्या संस्थानचा इतिहास ह्मटला ह्मणजे त्यांत इतर संस्थानांचे इतिहासांप्रमाणें हल्ले, लढाया वगैरे प्रकार असावयाचे नाहींत, हें सहजच लक्षांत येईल; पण इतर संस्थानांचे इतिहासाचें महत्व जसें सदर गोष्टी व राज्यक्रांति इत्यादिकांचे योगानें फार वाटतें, तसें या इतिहासाचें वाटणार नाहीं असें मात्र ह्मणतां येत नाहीं. तर इतरत्र शस्त्रयुद्धें व राज्यक्रांति जशा असतात, तशा यांत वाग्युद्धें व धर्मक्रांति ह्यांचा समावेश होत असल्यामुळें, एक तर मनोरंजन व दुसरें प्राचीन माहिती हीं ह्यांतही आहेतच. बरें, ती माहिती ही ह्मणजे ऐकून उगाच काल प्रतीक्षा करीत बसावें अशी ही नव्हे; तर तिचा सद्यः उपयोग करूं असें जर कोणी हरीचा लाल मनांत आणील, तर त्यास तसें करणें अशक्य नाहीं, अशी! ह्मणजे कल्पना करूं कीं, महाराष्ट्र देशाचा किंवा अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानाचा इतिहास वाचून, जर श्रीशिवाजी महाराज किंवा थोरले बाजीराव अथवा जार्ज वाशिंग्टन् ह्यांसारखें आपण ही कीर्तिमान् व्हावें असें कोणाच्या मनांत आलें, तर ती गोष्ट फार दुरापास्त-किंबहुना अशक्यच होय; त्याच प्रमाणें राव बाजींची कारकीर्द वाचून कोणाला वाईट वाटलें तरी त्यापासून ही तादृश फायदा नाहीं; कांकीं "बुंदसें गयीसों हौदसें नहि आती!" पण तोच जर समर्थ रामदास, तुकाराम किंवा साक्रेतीस यांचा कित्ता घेऊं ह्मणेल, तर प्रस्तुत काळीं तर काय, पण पुढें ही कोणत्या काळीं ती गोष्ट अशक्य नाहीं, हें सर्वानुभूतच आ

हे! तस्मात् निरनिराळ्या राजांच्या व राज्यांच्या घडामोडीच्या इतिहासापासून जो फायदा आहे*, त्यापेक्षां धर्म संस्थानासंबंधीं माहितीपासून जास्त नफा आहे; निदान त्यापेक्षां याचें महत्व किमपि कमी तरी नाहीं, म्हणून ह्या विषयीं अवश्य विचार केला पाहिजे हें कोणीही सुज्ञ कबूल करील.

हें संस्थान श्रीमच्छंकराचार्य जगद्गुरु ह्यांचें आहे, हें तर प्रसिद्धच आहे. तथापि याची प्राचीन माहिती काय, आचार्यांचा अवतार कधीं झाला, इकडे मठ स्थापना कधीं झाली, हल्लींची परंपरा मूळ आचार्यांपासून कसकशी आली, इत्यादि गोष्टींबद्दल जिज्ञासा प्रत्येक सद्धर्माभिमानी मनुष्याला- त्यांत विशेषतः स्मार्त ( शुध्दाद्वैत ) मतानुयायी पुरुषांस तरी होणें साहजिक आहे, म्हणून त्याविषयीं एथें लिहिणें वावगें होणार नाहीं.

ह्या देशांत अनेक धुरंधर राज्यांच्या उलाढाली अनेकदां झाल्या आहेत, पण पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणें इकडे इतिहास लिहून

---

* आपल्या बुद्धिमत्तेनें ज्यांनीं आपल्या गुरुजींपासून "बृहस्पति" हें नांव मिळविलें, त्या विद्वच्छ्रेष्ठांचा एका ठिकाणीं असा लेख आहे-"इतिहासामध्यें म्हटलें म्हणजे राजे, मंत्री, सेनापति इत्यादिकांचे गुण दोष वर्तांच्या बऱ्यावाईट आचरणाचे बरेवाईट परिणाम इत्यादि गोष्टींचें वर्णन असतें; परंतु राजांचे वगैरे अधिकार प्राप्त होण्याचा संभव जरी म्हटला, तरी तो लक्षावधि मनुष्यांत एखादे दुसऱ्यासच असतो. तेव्हां ज्यांच्या हातून जी गोष्ट घडण्याचा संभव मुळींच नाहीं ती अमुक रीतीनें केली असतां हित होतें, व अमुक रीतीनें केली असतां अनहित होतें, हें समजून मोठासा नफा नाहीं."

ठेवण्याची चाल पूर्वी नसो किंवा राज्य क्रांतींचे दंग्यामध्यें तसले लेख नाहींतसे झाले असोत; पण प्राचीन इतिहासासंबंधीं माहिती मिळत नाहीं, असें ह्या देशाचे आधुनिक इतिहासकार ह्मणत आहेत, हें प्रसिद्धच आहे. आतां मोठमोठ्या राज्यांच्या इतिहासाबद्दल जर अशी दुर्मिळता आहे, तर धर्मसंबंधी इतिहासाबद्दल माहिती मिळणें फार मुश्किलीचें काम आहे, हें उघडच आहे. तथापि श्रीमच्छंकराचार्यांचे माहितीबद्दल शोध करितां संस्कृत चार ग्रंथ मिळाले. त्यांत कित्येक स्थळें परस्पर विरोधी दिसतात, पण मूळ आचार्यांबद्दलचा इतिहास अनंतानंदगिरि किंवा आनंदगिरि ह्यांनीं केलेल्या "मतनिबर्हण" नामक ग्रंथांत जो नमूद आहे, तोच सप्रमाण दिसला व हल्लींच्या कित्येक ग्रंथकारांचें ही मत तसेंच आहे ह्मणून तदनुसारच संक्षेपानें आचार्यांचें इतिवृत्त एथें लिहितों.

परद्वीपस्थ लोक धर्माचे संबंधानें एकपक्षी काय पाहिजेत तें ह्मणोत, किंवा हवीं तशीं अनुमानें काढोत, पण एकंदरीनें पाहतां ह्या देशांतील सनातन धर्म ह्मटल्या ह्मणजे "वैदिक" होय. आतां वेदाची व्यवस्था अशी केली आहे कीं, मनुष्याच्या स्थितीप्रमाणें त्यास पायरी पायरीनें तत्व ज्ञान व्हावें. अगदीं प्रथमारंभीं मनुष्याला विशेष विचार शक्ति नसल्यामुळें कोणत्याही गोष्टीचा कार्य कारण संबंध समजण्यास त्याचें मन असमर्थ असतें; अर्थात् गहन असा तत्त्व विचार त्या स्थितींत त्याच्यानें कसा होईल? होणार नाहीं. पण कल्पना शक्ति चांगली असते, ह्मणून तशा काळांत त्याला सृष्टींतील चमत्कार पाहून फार आश्चर्य वाटतें व सकृद्दर्शनीं त्याचें मन तिकडे वेधतें. ह्मणून तशा स्थितींत सृष्टींतले जे सामान्य चमत्कार अरुणोदय (उ-

षस्), सूर्य (सविता) मेघ (इंद्र) विद्युत वगैरे त्यांच्या स्वरूपानेंच ईश्वर विषयक बुद्धि त्यांच्या मनामध्यें उत्पन्न होईल असें कथन करून पुढें क्रमाक्रमानें सृष्टींतून स्थूल देहावर, त्यावरून सूक्ष्म देहावर अशी ईश्वर भावना सांगून अखेर "तत्वमस्यादि" वाक्यांनीं ईश्वर स्वरूप ज्ञान सांगितलें आहे, आणि युक्तीच्या दृष्टीनें पाहिलें असतां, असा क्रमानें विषय सांगणें फार सोईचें आहे, हें अनुभव सिद्ध आहे. पण कित्येक विरोचनादि, मनांत पूर्ण विचार न चिंवतां एकेकच श्रुतिवाक्य घेऊन हाच सिध्दांत असें समजून आपापलें मत स्थापूं लागले.* तेव्हां मूळ वैदिक धर्म सुटून त्यांत अनेक मतें कालांतरानें झालीं. व कित्येक अहिंसेच्या मिषानें यज्ञ यागादिक बंद करण्याविषयीं खटपट करूं लागले, कोणी अन्य खटपटी करूं लागले; पण तत्कालीन राजे पूर्ण वैदिक धर्माभिमानी असल्यामुळें अशा शोतांडांचें कांहीं विशेष चाललें नाहीं.+ ह्या प्रमाणें द्वापार युगाचे अखेर पर्यंत सर्व व्यवस्था ठीक चालली. पण द्वापर युगाचे अखेर जें कौरव पांडवांचें महायुध्द झालें; त्यांत सर्व पृथ्वी निःक्षत्रीय झाली. अर्थात् कोणी प्रबल

---

* सह शांत हृदय एव विरोचनो ऽ सुरान् जगाम तेभ्यो हैतामुपनिषदं प्रोवाचात्मैवेह मह्य्य आत्मा परिचर्य आत्मानमेवेह महयन्नात्मानं परिचरन्नुभौ लोकाववाप्नोतीमञ्चामुञ्चेति॥४॥ छां॰ उ॰

+ शंखासुरानें वेद चोरून नेले व विष्णूनीं त्याचा संहार करून ते आणिले इत्यादि ज्या कथा पुराणांत आहेत, त्यांचें तात्पर्य असेंच घेतलें पाहिजे; कीं वेद चोरिले ह्मणजे वैदिक मार्ग मोडण्याची खटपट केली. नुसतें वेदाचें पुस्तक चोरून नेलें असें तात्पर्य घेण्यांत कांहींच अर्थ नाहीं, हें वाणास वाचकांचे ध्यानांत येईलच॥

राजा नाहींसा झाल्यामुळें मनःपूत वागण्यास लोकांस सवड मिळाली.ते-व्हां ही संधी पाहून चार्वाक व क्षपणक हे दोघे आपली मतें प्रसिध्दपणें प्र-तिपादूं लागले व ईश्वर नाहीं, परलोक नाहीं, वगैरे नास्तिक शास्त्र लोकांत प्रसृत झालें, असें त्यांच्या ग्रंथावरून अनुमान होतें. आतां हे तरी बृह-स्पति ह्मणून जो नास्तिकाचार्य त्याचें अनुयायी होते. त्यानांच लोकायत असें ही नांव आहे. ह्यांचे मताच्या प्रसार सुमारें युधिष्ठिर शक ६६० ह्मणजे शालीवाहन शकाचे पूर्वी २५१९ वे वर्षी होऊं लागला. ह्यांचीं धर दर्शविलेलीं मुख्य तत्वें व वैदिक धर्मावरील आक्षेप हीं सर्व दर्श* संग्रहांत विस्तार पूर्वक वर्णिलीं आहेत.

ह्यांचे पाठीमागून बुध्द व अर्हत् हे क्रमानेंच झाले. लोकाय-तांच्या व ह्यांच्या मतामध्यें फरक एवढाच कीं, लोकायत परलोक सु-द्धां मानीत नाहींत व हे परलोक व ईश्वर मानितात. पण वेद हे पौरुष हें ह्यांचें ही दृढमत होतेंच व त्या प्रमाणें ह्यांनीं यज्ञादि कर्में अहिंसा मिषानें बंद केलींच. आतां अमक्याच कालीं बुद्धाचा जन्म झाला हें जरी निश्चयात्मक रीतीनें अद्यापि ठरलें नाहीं, तरी बहुमतानें पहिला बुध्द शालीवाहन शकाचे पूर्वी २२०७ वे वर्षी मगधदेशांत (हल्लींचा तरार प्रांत) गयेजवळ साहस्रनामक गांवीं जन्मला. युरोपियन पं-डितांचें मत याशीं मिळत नाहीं. त्यांचें ह्मणणें इ० स० पूर्वी ५४३ वे वर्षी ह्मणजे शालिवाहन शकाचे पूर्वी ६२१ वे वर्षी बुध्दाचा जन्म झाला. पण या मताप्रमाणें इतर पुष्कळ ग्रंथाशीं विरोध येतो,

---

* पहा सर्व दर्शन संग्रह.

+ अर्वाचीन कोश पहा.

सबब पहिलेंच मत ग्राह्य होय असें ह्मटलें पाहिजे. असो; त्यांचे मागून ३४० वर्षांनीं दुसरा सर्वार्थ सिध्द नामक बुध्द व त्याचे मागून ६६५ तिसरा बुध्द झाला व अर्हत् हा शालिवाहन शका पूर्वी सुमारें १५९९ वे वर्षी बहार प्रांतांतील पाटना (पाटलिपुत्र) शहरीं जन्मला. उत्तरोत्तर त्याचे मताचे राजे होऊन चोहोंकडे या मताचा प्रसार झाला. हीं मतें सुमारें १५०० वर्षे पर्यंत चांगल्या रीतीनें चालली होतीं. ह्या मताचे अशोकादि जे राजे झाले त्यांच्या प्रयत्नानें ह्या मताला पुष्कळ उत्तेजन येऊन सर्व भरतखंडांत व सिंहलद्वीप, चीन, जपान, वगैरेकडे ही ह्या धर्माचा प्रसार झाला तो अद्यापि ही तिकडे आहे.

असें चाललें असतां इकडे कित्येक लोक आगमादिकांवरून नाना प्रकारचे मनःपूत पंथ काढून शाक्त, गाणपत्य, भैरवोपासक, सूर्योपासक, पाशुपत, वीरशैव, आकाशोपासक, चंद्रोपासक, असें आपणास ह्मणवूं लागले व सनातन वैदिक धर्म अगदीं लोपून चोहोंकडे पाखंड मताचा फैलाव झाला, व तसे लोक आपापल्या उपासना दर्शक चिन्हांनीं आंगावर खुणा करून घेऊन येथेच्छाचारानें वागूं लागले. त्यांचें आनंदगिरीनीं विस्तृत वर्णन केलें आहे*; असो.

---

* केचिच्छंभुरताः परे हरिरता वाणी रताः केचन ॥ अन्ये वन्हिरता दिवाकररता विघ्नेश रक्ताः परे ॥ केचिच्छक्ति रताश्च भैरव पराः केचिच्च मल्लारि माः ॥ विष्वक्सेन रताः परे मदनगाः केचिन्मदजन्त्यर्थपम् ॥१॥ केचित्सुरेशमपरे यमभप्पतिंच वायुं मही मुदक मंबर मादि मूर्ति ॥ केचिद्धिराजमपरे त्रिगुणान् ययेष्टं केचित्प्रधान मणुवाद मुपात्त कर्म ॥२॥ केचिच्चंद्र पराः परे कुजपराः

ह्या प्रमाणें सर्व भरत खंड पाखंडानें भरलेलें पाहून नारद मुनींनीं हें वर्तमान ब्रह्म देवाला कळविलें व ब्रह्मदेवानें शंकराला कळविलें. तेव्हां शंकरानीं आश्वासन देऊन त्यांस सांगितलें कीं, मी " शंकराचार्य " अशा नांवानें पृथ्वीवर प्रकट होऊन सन्मताचें स्थापन करीन. असें सांगून वेदोक्त कर्म मार्गाचा उद्धार करण्या करितां प्रथम कार्तिक स्वामीस पृथ्वीवर पाठविलें. तेव्हां शिवाज्ञा मस्तकीं वंदून स्वामी कार्तिकेय हा आंध्र उत्कल ह्या देशांच्या सीमेवरील एका मोठ्या नदीतीरीं "जयमंगल" म्हणून एक गांव आहे, त्या गांवांतील एका तैत्तिरीय यजुर्वेदी तैलंग ब्राह्मणाचे उदरीं शालिवाहन शका पूर्वी १०७० वे वर्षी धातृ नांम संवत्सरीं वैशाख शुद्ध १५ रविवार मध्यान्हीं जन्मला. त्याचे बापाचें नांव यज्ञेश्वर भट्ट व आईचें नांव चंद्रगुणा असें होतें. त्यानीं पुत्राचें नांव " कुमारील भट्ट " असें ठेविलें. पुढें " भट्टपाद " असें दुसरें नांवही त्याला पडलें. चूडाकर्मादि संस्कार झाल्यावर कुमारीलभट्ट यांनीं " श्री विकेतन " नामक जैनाचार्या जवळ अध्ययन करण्याचे निमित्तानें रहून त्यांचें मत पूर्णपणें समजून घेतलें. पण हा कुमारील भट्ट अस्सल श्रुतीचा अभिमानी व कर्मकांडाचा पुरस्कर्ता हो-

---

मा॰ चा॰

केचित्तु सौम्योत्सुकाः केचिज्जीव पराः परे भृगुपराः केचित्तु मंदाग्निताः॥ केचित्काल पराः परे पितृ पराः केचित्तु नागेशगाः केचित्तार्क्ष्य पराश्च सिध्द निचयं सेवंति केचिध्दिया ॥३॥ केचिद्गंधर्व साध्यादीन् भूत वेतालगाः परे॥ एवं नाना प्रभेदा स्युर्नृणां वृत्तिर्यथेप्सितम् ॥४॥ किंच स्ववृत्तिं वेदार्थैः प्रतिपाद्यां समूचिरे ॥ निजेच्छा कृति संगेषु धारयन्ति रुषान्विताः॥५॥इ॰

आ॰ कृ॰ म॰ नि॰ प्रकरण २

ता यास्तव पुढें जैनाशीं द्वेष पडून कडाक्याचीं वाग्युद्धें होऊं लागलीं; त्यांत भट्टपाद यांनीं अनेक प्रतिपक्षी पंडितांस अनेक ठिकाणीं पादाक्रांत करून टाकिलें. ह्या प्रमाणें भट्टपाद दिग्विजय करीत बंगल्यांत मेदिनीपूर ( मिदनापूर ) एथें पोहोंचले. तेथें शंकराज्ञेवरून, इंद्र सुधन्वानामें राजाच्या अवतार घेऊन, राज्य करीत होता. तो राजा यद्यपि जैन धर्मी होता, तथापि वादानें व दिव्यानें भट्टपादांनीं वेदांचे प्रामाण्याविषयीं खात्री करून दिल्यावरून,* त्या राजानें आसेतु हिमाचल सर्व पाखांड मत वाद्यांचा संहार करण्याविषयीं चोहोंकडे आज्ञा देऊन ती सक्तीनें अमलांत आणिली. तेव्हां भट्टपाद हे सौगतादिकांना केवळ यमाप्रमाणें भासूं लागले. एवंच भट्टपादांनीं खळवाद्यांचा संहार करून अनादि कर्ममार्गाचें पुनरुज्जीवन केलें, व कर्मकांड प्रतिपादन पर प्रथमतः जैमिनी सूत्र भाष्य लिहून नंतर "जैनमत भंजन" या नांवाचा ही एक ग्रंथ लिहिला.

ह्या प्रमाणें कर्म मार्गाची स्थापना होऊन त्याचा प्रसारही अव्याहत होऊं लागला, तेव्हांन शंकराज्ञेवरून ब्रह्मदेव, महा कर्मठ "मंडन मिश्र"+ या नांवें करून, कान्यकुब्ज ( कनोजी ) जातीच्या ब्राह्म-

---

* पहा माधव कृत शंकर विजय सर्ग १ पहा अ. को. १३ प.

\+ चतुर्थाश्रम ग्रहणानंतर, विश्वरूपाचार्य वसुरेश्वराचार्य अशीं यानांच नांवें पडलीं. व दक्षिणेकडील आचार्य स्थापित मठाचें आधिपत्य प्रथमतः श्रीमदाचार्यांकडून यांना मिळून पुढें शिष्य परंपरा चालू झाली. हे अवतारी असल्यामुळें, जरी गौड होते ( सारस्वताः कान्यकुब्जा गौडा मैथिल उत्कलाः॥ पंच गौडा इति ) तरी गौड द्राविड दोन्ही ब्राह्मणांमध्यें यांची शिष्य परंपरा चालू झाली. मस्तुत मात्र गौडांपासून द्राविडांनीं उपदेश घेण्याचा शिष्टाचार या देशांत नाहीं असें दिसतें

णामध्यें अवतरून भट्टपादानीं स्थापिलेल्या कर्म मार्गाच्या प्रतिपादन पूर्वक प्रसार करूं लागले, यामुळें भट्टपादांच्या मताला मोठेंच पाठब ळ झालें. मंडन मिश्रानीं तरी केवळ शाद विवादाकडेच चित्त दिलें होतें असें नाहीं; तर आपले सिध्दांत शिष्यांना पढवून ते कायम करून टा कण्याचाही सपाटा चालविला. फक्त यांचे घरींच जेऊन राहून अनेक विद्यांचें अध्ययन करणारे पांचशें शिष्य होते!

वर लिहिल्याप्रमाणें धर्मक्रांति होऊन, बहुतेक लोक श्रौत मार्गानु सारं कर्में आचरूं लागले; तेव्हां कर्मांच्या योगानें शुध्द* झालेलीं मनें आ तां तत्त्व विचार करण्यास योग्य आहेत, ह्यास्तव उत्तर मिमांसा प्रतिपाद नार्थ आतां भूतलावर आपण अवतरावें असें श्री शंकरानीं मनांत आ णिलें. ह्यावेळीं द्रविड देशांत कावेरी नदीच्या दक्षिण तीरीं कुंभकोण म् व त्रिचनापल्ली यांचे मध्यें चिदंबर ह्मणून जें नगर आहे, तेथें वि श्वजित् नामक महातपोनिष्ठ द्राविड ब्राह्मण, तेथील आकाश लिंग(चि दंबरेश्वर) ह्याची आराधना भक्तीनें करीत असे. ह्याच्या स्त्रीचें नांव अं बिका देवी (विशिष्टा बाई) ही ही मोठी पतिव्रता व धर्मनिष्ठ अशी अ से. ही चिदंबरेश्वराच्या प्रसादानें, सुवेळीं ह्मणजे शा॰ शकाचे पूर्वी १०२३ वे वर्षीं रक्ताक्षीनाम संवत्सरीं माघ वद्य चतुर्दशी (महाशिवरा त्रि) सोमवार रोजीं मध्य रात्रीं, सर्व लोकांचें कल्याण करणाऱ्या अशा

---

* चित्तस्य शुध्दये कर्म नतु वस्तूप लब्धये ॥
वस्तु सिध्दिर्विचारेण न किञ्चित्कर्म कोटिभिः॥१॥ वि॰चू॰
ऋषिर्न सुर्ई गुर्णेयो पांडवानां महात्मनाम् ॥
गणनातोप कालस्य शकस्य त्रिजन्म नि॥ अ॰ को॰ (जैनग्रंथ)

सुपुत्रास प्रसवली. तेव्हां आकाशांत दुंदुभी वाजल्या व देवांनीं पुष्पवृष्टि करून आपला आनंद प्रदर्शित केला. हा पुत्र शंकर प्रसादानें झाला म्हणून त्याचें नांव शंकर असें वडिलानीं ठेविलें. हेच भगवत्पूज्यपाद श्रीमच्छंकराचार्य होत.

आचार्यांची आकृति जशी सर्व लक्षणांनीं पूर्ण होती तशी त्यांची बुद्धी ही सर्व विषयांत परिपूर्ण होती. ते लहान पणींच संस्कृत व मागधी ह्या भाषांत प्रवीण झाले. त्यांचें चौलकर्म तिसऱ्या वर्षी (चूडा कार्यो द्विजातीनां सर्वेषामेव धर्मतः॥ प्रथमेऽब्दे तृतीयेवा कर्तव्या श्रुतिचोदनात्॥ प्राप्तेतु पंचमे वर्षे विद्यारंभंच कारयेत्) व मौंजी बंधन आणि अध्ययन हीं पांचव्या वर्षी झालीं. हे एकवार श्रवण केल्यानेंच सर्व विद्या पारांगत झाले. नंतर मौंजी, दण्ड, अजिन वगैरे ब्रह्मचर्य चिन्हें धारण करून लोकांस उपदेश करूं लागले. पण स्वतः आपण कर्म प्रपंच हेतु भूत गार्हस्थ्याच्या पलीकडे गेल्या शिवाय लोक त्या मार्गाचें झटून अवलंबन करणार नाहींत असा विचार करून, आपल्या वयाचें आठव्या वर्षीच गौडपादाचार्यांचे शिष्य गोविंद यतियांपासून आचार्यांनीं परमहंस दीक्षा घेतली*. नंतर गुर्वाज्ञेनें व्यास

---

* आश्रम धर्माचें क्रमानें पालन करावें हा श्रुति संमत मुख्य पक्ष खरा. तथापि मध्येंच जर एखाद्याला खरोखर वैराग्य उत्पन्न होऊन ब्रह्म जिज्ञासा प्राप्त होईल, तर तेवढ्या पुरती श्रुतीनें "यदिवे तरथा ब्रह्मचर्या देव प्रव्रजे द्गृहाद्वा वनाद्वाय पुनर्व्रती वा स्नातकोवोत्सन्नाग्निरनग्निकोवायदहरे व विरजेत्तदहरेव प्रव्रजेत्" अशी मोकळीक दिली आहे; ह्मणून आचार्यांनीं ब्रह्मचर्यानंतर संन्यास घेतला हें युक्तच झालें; पण आचार्यांनीं असें केलें म्हणूनच, खरोखरच विरक्ति प्राप्त न होतां, तसें करणें हें असमंजस होय.

सूत्रांवर अद्वैत भाष्य केलें. जे मुमुक्षु शरण आले त्यांस शिष्य करून, उपदेश करीत त्यां सहवर्तमान चिदंबर पुराहून दिग्विजयास निघाले. ते प्रथम कुंभ कोणाचे पूर्वेस "मध्यार्जुन" एथें येऊन तेथें शिवाची आराधना करून, अद्वैत सत्य किंवा द्वैत सत्य हें सांगून लोकांची संशय निवृत्ति करण्या विषयीं प्रार्थना केली. तेव्हां मध्यार्जुन साक्षात् प्रगट होऊन "अद्वैत सत्य" असें त्रिवार बोलून गुप्त झाला. नंतर श्रीमदाचार्य तेथून निघून रामेश्वरास जाऊन. षड्विधशैव, पन्मत काला नल इत्यादिकांस जिंकून अनंत शयनास गेले, व त्यांनीं तेथेंही अनेक द्वैत वाद्यांस आपल्या मतांत आणिलें. पुढें तेथून श्रीक्षेत्र काशीस जाऊन कांहीं दिवस वास्तव्य केलें तेथें एके दिवशीं शिष्यांस भाष्य पढवीत असतां ब्राह्मणाचे रूपानें व्यास प्रगट झाले. त्यांबरोबर मोठ्या कडाक्याचा वाद विवाद होऊन अखेरव्यासांनीं आपलें रूप प्रकट केलें व माझ्या सूत्राचा अर्थ तूं उत्तम जाणतोस त्यास्तव तूं आचार्य जगद्गुरु होस असें ह्मणाले. त्या काळीं आचार्यांनीं विनंति केली कीं, माझी आयुर्मर्यादा सोळा वर्षांची आहे, ती पूर्ण झाली त्या कारतां आतां हें मीं केलेलें भाष्य आपण ठेवावें व मला परलोकीं जाण्यास आज्ञा असावी. हें ऐकून व्यासांनीं ब्रह्मदेवाचें स्मरण केलें, व त्या पासून आचार्यांस इच्छेस येईल तितके दिवस पृथ्वीवर राहण्याचा वर मिळाला आणि व्यास व ब्रह्मदेव दोघेही अंतर्धान पावले. नंतर आचार्यांनी उत्तरेकडे कुरुक्षेत्र बदरी नारायण वगैरे क्षेत्रें आपल्या मतांत आणून अयोध्येवरून प्रदक्षिणीक मल्लिकार्जुन एथें एक महिना भर येऊन राहिले. तों सिद्ध पुराहून कांहीं ब्राह्मण तेथें आले होते. त्यांनीं आचार्यांजवळ कुमारील भट्टाची ख्याति, सांगितल्यावरून त्यांशीं वाद करण्या करितां आचार्य

शिष्यां समवेत सिद्धपुराला गेले.

इकडे कुमारील भट्ट (भट्टपाद) यानीं सर्व नास्तिकांचा संहार करेवून कर्म मार्ग प्रवृत्त केला पण आपण जैनाचार्यांजवळ अध्ययनमिषानें राहून त्यांचाच नाश करण्यास कारणी भूत झालों, हें मोठें पाप घडलें, त्यास्तव त्या पापाचे निष्कृती करितां आपण अग्नि प्रवेश करावा असा विचार करून प्रयाग एथें जाऊन तुषाग्नि सिद्ध करून ते अग्नि प्रवेश करीत होते, इतक्यांत श्रीमदाचार्यही तेथें येऊन पोहोंचले. भेट होतांच आपलें भाष्य आचार्यांनीं त्यांस दाखविलें. व अग्नि प्रवेशाचा निश्चय रहित करण्या विषयीं फार आग्रह केला. परंतु भट्टपादानीं विनंति केली कीं, अंतकाळीं आपलें दर्शन झालें ही गोष्ट फार उत्तम झाली. आतां माझें बहुतेक शरीर दग्ध होत आलें त्या करितां, कर्म मार्गाचें खंडन करून निवृत्ति मार्ग स्थापित करण्याचा जो आपला मनोदय आहे, त्याप्रमाणें वाद करण्याचें माझें सामर्थ्य नाहीं; आपण माहिष्मती नगरींत जाऊन तेथें महाकर्मवादी जो मंडनमिश्र त्याशीं वाद करावा; तो कर्म मार्गाभिमानी धुरंधर आहे. आतां मला परलोकीं जाण्यास आज्ञा असावी तेव्हां हें ऐकून आचार्यांनीं त्याचा निरोप घेऊन पुढें प्रयाण केलें व भट्टपादानीं अग्निप्रवेश केला; त्यावेळीं त्यांचें वय ६३ वर्षांचें होतें. ही गोष्ट शालिवाहन शकाचे पूर्वीं १००७ वर्षीं घडली.

इकडे श्रीमदाचार्य शिष्यांसहवर्तमान माहिष्मती नगरींत येऊन मंडनाचे घराचा शोध करीत त्याचे घरीं दोन प्रहरीं आकाश मार्गानें गेले व त्याशीं १०० दिवस पर्यंत वाद करून अखेर त्या वादांत मंडन मिश्रास जिंकून पूर्वीं ठरलेल्या प्रतिज्ञे प्रमाणें त्यास संन्यास दिला,

व त्याचें नांव सुरेश्वराचार्य ( विश्वरूपाचार्य ) असें ठेविलें. या वादांत मंडनाची स्त्री, सरस्वतीचा अवतार, जी सरसवाणी ती साक्षीस होती. या प्रसंगींचीं उभयतांचीं प्रश्नोत्तरें, पुढें आचार्यांचा परकाया-प्रवेश, शिष्यांनी गायकरूपानें जाऊन गायनांत केलेल्या सूचना, नृसिंहसाक्षात्कार वगैरे गोष्टी फारच मनोवेधक आहेत, परंतु विस्तार भीतीमुळें एथें संपूर्ण घेतां आल्या नाहींत, यास उपाय नाहीं; असो. पुढें मंडनमिश्र सुरेश्वराचार्य यानामें प्रख्यात झाले. व उपनिषद्भाष्यावर आचार्यांच्या आज्ञेनें त्यांनीं वार्तिकें केलीं. पुढें श्रीमदाचार्यांनीं शृंगेरी एथें जो मठ स्थापिला, त्या मठांत ह्यांचीच स्थापना केली. त्याच प्रमाणें दुसरे पद्मपादाचार्य यांस द्वारावतीस मठाची स्थापना करून तेथें ठेविलें, तिसरे तोटकाचार्य यांस बदरी केदारीं मठाची स्थापना करून तेथें ठेविलें. व तेथील रत्नशिंग नामक राजाला, मठास सर्व प्रकारें मदत करण्याविषयीं आज्ञा केली.* चवथे हस्तामलकाचार्य यांस ओढियाजगन्नाथ एथें मठ स्थापून तेथें ठेविलें. ह्याप्रमाणें चार दिशांस चार मठ स्थापून, तेथें चौघां पट्ट शिष्यांस बसवून, शृंगेरी एथें श्री यंत्राची स्थापना करून आचार्य काशीला गेले. तेव्हां प्राकृत लोकांना एकाएकीं शुद्धाद्वैत मार्गाचें ज्ञान होण्यास कठीण पडेल, अशी शिष्यांनीं विनंति केल्यावरून, शैव, वैष्णव, गाणपत्य, सौर, देवी, व भैरव या सहा मतांचें स्थापन प्राकृत लोकांकरितां करून, नंतर श्रीनगर एथें जाऊन अनेक वादी लोकांस जिं

---

* तोटक वृत्तानें आचार्यांची स्तुति केली ह्मणून तोटकाचार्य असें यांस नांव पडलें. यांचें पूर्वीचें नांव "कलानाथ" होतें. यांनीं केलेलें स्तोत्र शेवटीं लिहिलें आहे.

कूंन व श्रीसरस्वती बरोबर वाद करून, त्यांनीं सर्वज्ञ पीठावर आरोहण केलें.

नंतर जगद्गुरुस्थानीं विराजमान झालेल्या श्रीमदाचार्यांस सर्व लोकांनीं महाभिषेक केला. मग त्यांनीं सर्व लोकांस निवृत्तिपर उपदेश केला,* व सर्व शिष्यांस वैदिक धर्माची वृद्धि करण्याविष

---

* आचार्यांच्या भाषेची शैली, बोधकता, श्रुति, युक्ति, अनुभूति यांची एक वाक्यता करण्याची हातोटी, भाषेचा उदात्तपणा, हीं त्यांचे भाष्यादि ग्रंथ पाहिल्यावांचून पूर्ण रीतीनें मनांत येणें अशक्य आहे. तथापि दिग्दर्शनार्थ तेवढा निर्याणकालच्या उपदेशाचा उतारा आमचे प्रिय वाचकांकरितां एथें सादर केल्यावांचून राहवत नाहीं:-

"वेदो नित्यमधीयतां तदुदितं कर्म स्वनुष्ठीयतां ॥ तेनेशस्य विधीय-"
"तामपचितिः काम्ये मतिस्त्यज्यताम् ॥ पापौघः परिधूयतां भवसुखे"
"दोषोऽनुसंधीयतामात्मेच्छा व्यवसीयतां निजगृहात्तूर्णं विनिर्गम्य"
"ताम् ॥१॥ संगः सत्सु विधीयतां भगवतो भक्तिर्दृढा धीयतां ॥ शां-"
"त्यादिः परिचीयतां दृढतरं कर्माशु संत्यज्यताम् ॥ सद्विद्वानुपसर्पतां-"
"प्रतिदिनं तत्पादुके सेव्यतां ब्रह्मैकाक्षरमर्थ्यतां श्रुतिशिरोवाक्यं स"
"माकर्ण्यताम् ॥२॥ वाक्यार्थश्च विचार्यतां श्रुतिशिरःपक्षः समाश्री"
"यतां दुस्तर्कात्सुविरम्यतां श्रुतिमतस्तर्कोऽनुसंधीयतां ॥ ब्रह्मैवास्मिवि"
"भाव्यतामहरहर्गर्वः परित्यज्यतां ॥ देहेऽहंमतिरुझ्झतां बुधजनैर्वादः"
"परित्यज्यताम् ॥ ३॥ क्षुद्व्याधिश्च चिकित्स्यतां प्रतिदिनं भिक्षौषधं भुज्य"
"तां ॥ स्वाद्वन्नं नतु याच्यतां विधिवशात्प्राप्तेन संतुष्यतां ॥ शीतोष्णादि"
"विषह्यतां नतु वृथा वाक्यं समुच्चार्यतां ॥ औदासीन्यमभीप्स्यतां जनकृ"

यीं आज्ञा करून महाप्रस्थानानें हिमालयावर आरोहण केलें. तेथें ब्रह्मादि देव, नारदादि देवर्षि, यक्ष, गंधर्व, किन्नर इत्यादि सामोरे येऊन समारंभानें त्यांस कैलासीं घेऊन गेले. या प्रमाणें श्रीमद्भगवत्पूज्य पादाचार्यांचें निर्याण, त्यांचे ३२ व्या वर्षी ह्मणजे शा॰ शा॰चे पूर्वी ९९१ व्या वर्षी दुर्मुखनाम संवत्सरीं मार्गशीर्ष शुक्ल १३ सोमवार रोजीं झालें. ह्मणजे श्रीमच्छंकराचार्यांना होऊन गेल्यास आज शके १८०९ मध्यें बरोबर २८०० वर्षें होतात.

ह्याप्रमाणें ह्या जगद्गुरुपदाच्या स्थापनेचा मूल वृत्तांत अहे. प्रस्तुत जागजागीं जीं धर्मसंस्थानें प्रसिध्द आहेत, ह्मणजे कुडलगी, करवीर, पुष्पगिरी, हंपी, कुंभकोण, सोंदी, रामचंद्रपूर वगैरे;

---

मा. वा.

"पानैर्दुर्यमुत्सृज्यतां ॥ ४॥ एकांते सुखमास्यतां परतरे चेतःसमा"
"धीयतां ॥ पूर्णात्मा सुसमीक्ष्यतां जगदिदं तद्बाधितं दृश्यतां ॥ प्राक्क"
"र्म प्रविलाप्यतां चितिबलान्नाप्युत्तरे श्लिष्यतां ॥ प्रारब्धं त्विह भुज्य"
"तामथ परब्रह्मात्मना स्थीयताम्! ॥ ५॥"

ह्यावर भूधराख्य पंडितानीं सुबोध टीका केली आहे. आचार्यांनीं असे आणखी प्रवृत्तींत व निवृत्तींत उपयोगीं पडणारे अनेक उपदेश केलेले आहेत; पण अंशतः तरी त्यांचा उपयोग या चिमुकल्या पुस्तकांत संग्रह व्हावा कसा?

* ज्या सद्गृहस्थांच्या अव्याहत परिश्रम पूर्वक शोधामुळे आह्मांस ही मिती इतकी निश्चित सांगतां आली त्या कैलासवासी रघुनाथ भास्कर गोडबोल्यांचे फार फार आभार मानितों.

त्यांच्या स्थापनाही कारण वशात् यानंतर झाल्या आहेत. आतां ह्या प्रत्येक संस्थानाबद्दल कांहीं तरी निरनिराळा इतिहास असणें साहजिक आहे; पण तूर्त त्यांपैकीं "करवीर व संकेश्वर" मठाबद्दल जी माहिती मिळते ती दाखल करण्याचा उद्देश आहे; असो.

पूर्वी लिहिल्या प्रमाणें श्रीमदाचार्यांनीं शृंगेरी येथें मठस्थापना करून, तेथील मठाधिकार विश्वरूपाचार्य (सुरेश्वराचार्य) यांस देऊन सर्व देशांत धर्माचरण योग्य रीतीनें चालवून सदाचार वाढवावा, अशी आज्ञा केली, व ते पुढें हिमालयावर गेले. पश्चात् आचार्यांनीं ठरविल्या प्रमाणें व्यवस्था पाहत श्री सुरेश्वराचार्य यानीं पुष्कळ* वर्षें अधिकार चालविला.

ह्या विश्वरूपाचार्यांचे मागून शिष्य परंपरेनें आठवे पुरुष "विद्याशंकर भारति" हे प्रसिध्द झाले. ह्यांचें जन्म शा० श० ४२१ मध्यें पिता शिवगुरु व माता गिरिजादेवी ह्यांचे उदरीं मल्याळ देशा

---

* आलीकडे शृंगेरी मठाचे माहितीबद्दल एक पुस्तक छापून प्रसिद्ध झालें आहे; त्यांत सुरेश्वराचार्य हे ७२५ वर्षें अधिकारापन्न होते. योगबलानें वरचेवर ते आपला मृत्यु टाळून राहिले होते, अशी माहिती आहे. आतां चांगदेव, कबीर इ० कित्येक आलीकडील साधुही साधारण मनुष्याच्या आयुर्मर्यादेपेक्षां फार दिवस जास्त वांचले अशी ही प्रसिद्धि आहेच; त्याप्रमाणें योगबलानें पुष्कळ वर्षें भूतलावर राहणें असंभाव्य नाहीं. पण त्या पुस्तकांत आचार्यांचा जो विक्रम शक ४६ लिहिला आहे, त्याला मात्र बरेच विरोध दिसतात. अर्थात् सुरेश्वरांचा ही काल त्या पुस्तकांत लिहिलेल्या कालापेक्षां मागील असला पाहिजे, हें उघड आहे.

मध्यें प्रमाथीनाम संवत्सरीं माघ कृष्ण चतुर्दशीला झालें व त्यांनीं आपले वयाचे १५ वे वर्षी शृंगेरीला जाऊन तेथें ९ वर्षें अध्ययन करून आश्रम घेतला आणि १५ वर्षें अधिकाराचें काम करून नंतर बरेच दिवस पृथ्वी पर्यटन करीत करीत अखेर दक्षिण काशी श्री क्षेत्र करवीर येथें येऊन कांहीं दिवस वास्तव्य केलें. पुढें एके वेळीं सूर्यपर्वी समुद्रस्नान करण्याकरितां हे गेले असतां तेथेंच समाधिस्त झाले. त्यावेळीं त्यांचें वय ७० वर्षांचें होतें. हें समाधिस्थान ठाणें जिल्ह्यांत वसई जवळ **विमळ निर्मळ** ह्मणून क्षेत्र आहे तेथें आहे. समाधीची इमारत लहानशी आहे. तेथें नेहमी अन्नसत्र आहे, कार्तिकमासीं प्रतिवर्षी यात्रा भरते. समाधिनजीक एक बागायत जमीन आहे, तिची व्यवस्था संकेश्वर मठाकडून पंचांकडे सोंपविलेली आहे असें समजतें.सदरील श्री विद्याशंकर भारतीनीं संक्षेप शारीरक, प्रबोध सुधाकर वगैरे कित्येक ग्रंथ लिहिले आहेत व भास्कर, दंडी वगैरे कित्येक पंडितांस ही वादांत जिंकिलें.

यानंतर जे पुरुष क्रमानें गादीवर बसले, त्यां संबंधी लिहिण्यासारख्या, विशेष गोष्टी कांहीं झालेल्या समजल्या नाहींत; पण श्रीमदाचार्यांनीं ज्या मताची स्थापना केली, त्या शुद्धाद्वैत मताचें ज्ञान चांगल्या अभ्यासानें ही श्रम साध्य ह्मणून, सौर गाणपत्यादि षण्मतें आचार्यांच्या अनुमतानेंच अवशिष्ट राहिलीं होतीं, आणि जैन व बौद्ध वगैरे मतांचे लोकही त्यावेळीं जे कांहीं अवशिष्ट राहिले होते, तेही यथाशक्ति आपापल्या मतांचा प्रसार करीतच होते व कालानुरोधानें राजाश्रय वगैरे असंजसा मिळत गेला त्या त्या प्रमाणें तीं तीं मतें पुनः प्रबल होऊं लागलीं, व त्याप्रमाणेंच त्यांच्या विरुद्ध लोकांच्याही खट

पडी सुरू होऊन या देशांत पुनः अनेक धर्म मतें चालू झाली. त्यावे-ळीं ह्मणजे सुमारें शालिवाहन शकाचे चवथ्या शतकापासून सोळाव्या शतका पर्यंत या देशांत राष्ट्रकूट, चालुक्य, कलभूर्य, यादव, रट्ट [हे जैन धर्मी होते. त्यांची राजधानी सुगंधवती (सौदत्ती) शहर होतें.] कदं-बहे वैदिक धर्मी होते. शिलाहार (कोल्हापूरचे महामंडळेश्वर) व मुसलमान वगैरे राजांचा अम्मल होता, असें शिला लेख इत्यादिकांवरू-न जे हल्लीं शोध लागले आहेत त्यावरून दिसतें. शिरोळ पेट्यापैकीं "खिद्रापूर" ह्मणून जो गांव हल्लीं ह्या संस्थानाकडे आहे, तेथें "को-पेश्वर" ह्मणून महादेवाचें मोठें पहाण्यासारखें देवालय आहे; त्या-चा बराच भाग छिन्न भिन्न झाला आहे तरी देखील राहिलेल्या इमा-रतीवरून त्या काळचें वैभव व्यक्त होत आहे. त्या देवालयाचे दक्षि-ण दरवाजाजवळ एक शिलालेख आहे, त्यांत यादव वंशांतील सिंहणदेवे

---

* गौरीपतेः पुरजयोत्सव केलिभाजः स्वेदोद बिंदु निकरान्निटिलप्रसूतात्॥ जातः कदंब तरुमूल मुपागताद्विख्यात स्त्रिलोचन कदंब इति त्रिलोक्यां॥१॥ तस्यान्वये केऽपि नृपा बभूवुः कादंब भूपाल कुल प्रदीपाः॥ यदश्वमेधेषु निखातयूपैः पुण्यद्रुमैरंकुरुतेव पृथ्वी॥२॥ शि० ले०"

+ त्या देवालयाचें व गर्भातील क्षेत्राचें वर्णन चमत्कारिक आहे; पण तें स विस्तर एथें देण्यास सवड नाहीं. (पुरवणी पहा) फक्त सदर शिलाले-खापैकीं मात्र कामा पुरता उतारा एथें घेतों—

" श्रीः नमस्तुंग शिरश्चुंबी छत्र चामर चारवे॥ त्रैलोक्य नगरारंभ मूल स्तंभाय शंभवे॥ + + + स्वस्तिश्री शके वर्ष ११३६ श्री सुखनाम संवत्सरे चैत्र सूर्य पर्वणि श्रीमद्देव गिरावधिष्टित समस्त भुवनाश्रय श्री पृथ्वी वल्ल

राजानें शके ११३६ मध्यें श्री कोपेश्वर देवाकडे सदर गांव इनाम दिल्या बद्दल शासनपत्र आहे. हा सिंहण देव देवगडच्या यादव राजांपैकीं होय. जयटक देवाच्या मागून शके ११३२ मध्यें हा गादीवर बसला, व शके ११६९ मध्यें याची कारकिर्द संपली. तमाम संकेश्वर एथील देवालयांत जे शिलालेख आहेत, त्यांपैकीं एक रट्ट वंशांतील सत्रावा राजा कार्तवीर्य चवथा याच्या वेळचा आहे; त्यांत शके ११२१ ते ११२४ आहेत, व सदर देऊळही जखनाचार्य यानें बांधिलें असें म्हणतात.[+] हा जखनाचार्य कोण याबद्दल कांहीं माहिती मिळाली नाहीं.

बहामनी वंशांतील चवदावा राजा दुसरा महमद (शके १४०४ ते शके १४४० पर्यंत) ह्याचा कोंकण प्रांताचा सुभेदार बहादूर गिलानी याणें बंड करून शालीवाहन शके १४०८ ह्या वर्षी बेळगांव (अजमनगर) आणि गोवा हे दोन प्रांत आपले ताब्यांत घेतले व संकेश्वर हें आपले गादीचें मुख्य ठिकाण केलें. आणि आपण स्वतंत्र बादशाह आहों, विजापूरचे ताबेदार नव्हे" वगैरे प्रसिध्द करून स्वतंत्रतेनें वागूं लागला. हें वर्तमान बादशाहास[*] कळलें तेव्हां तो कलबुर्गा-

---

भ महाराजाधिराज परमेश्वर द्वारावती पुरवराधीश्वर विष्णु वंशोद्भव यादवकुलकमल कलिका विकासभासुर ++ श्रीमत्प्रतापचक्रवर्ती महाराज सिंघण देवः शासन पत्रं प्रयच्छति ++ तदेव जीर्णोद्धारी कृत्य श्री सिंघणदेवः श्री कोपेश्वर देवाय प्रदत्तवान्॥ आनंदामृत सागरस्य भरणेयः पूर्णचन्द्रायतेयः कार्पण्य तमस्ततेश्च हरणे-मार्तांड तांदीकते॥ यश्चायं हृदये निवेशित हरः क्षीराब्धिना स्पर्धते। तस्य श्री भुजवल्लरी विजयते सिंहाब्द पृथ्वीपतेः॥ +++.

\+ पहा बेळगांव ग्याझीटियर पान ६०१.

* ह्या ब्राह्मणी बादशाहाबद्दल मराठी इतिहासांत फारशी माहिती

हून अमरखेंडीवरून शा० शके १४१७त संकेश्वराला आला व त्यानें वेढा घालून संकेश्वर तीन दिवसांत घेतलें. त्यावेळीं तेथील तटबंदी पुरी झाली नव्हती. (तैलंग स्वामीच्या कारकिर्दीत तटबंदीचें काम पुनः सुरू झालें होतें, पण तेव्हांही तडीस गेलें नाहीं. हल्लीं गांवाचे आग्नेयीकडे मात्र थोडीशी तटबंदी आहे.) त्या लढाईंत बहादर गिला नी मारला गेला व बंडवाले बादशाहास शरण आले. शके १५०१ त्यावर्षी विजापूरचे अदिलशाही सरकाराकडून संकेश्वर हें कोल्हापूर प्रांतापैकीं एक भाग म्हणून छत्रपति पहिले शिवाजी महाराज यांचे ताब्यांत आलें. सारांश वरती लिहिल्याप्रमाणें अनेकशः ज्यांच्या उलाढाली होऊन अनेक धर्ममतें पुनः यादेशांत चालू झालीं.*

---

मा. पु.

नाहीं; यास्तव विशेष खुलासा करण्याविषयीं कित्येक मित्रांनीं सुचविल्यावरून थोडें लिहितों. त्याराज्याची स्थापना शा० श० १२६९ मध्यें जाफरखान त्यानें केली व त्यानें १० वर्षे राज्य केलें. त्यांत शांतता होती. त्याची राजधानी कलबुर्गे शहर होतें. हें राज्य शके १३०० पासून १३४४ पर्यंत भरभरांटींत होतें. त्या घराण्यापैकीं अहमदशाहा बहामणी त्यानें अमदाबाद व बेदर हीं शहरें वसविलीं (शके १३६२) त्या वंशांत १ जाफरखां, २ मुहामेद, ३ मुजाहीद, ४ दाऊदशाहा, ५ महमुदशहा (पहिला), ६ गाझीउद्दीन, ७ शमसुद्दीन, ८ फेरोजशाहा, ९ अहमदशाहा, (पहिला) १० अल्लाउद्दीन (दुसरा), ११ हुमायून शाहा झलीम, १२ निझामशहा, १३ मुहामेद, १४ महमूदशाहा (दुसरा), १५ अहमदशाहा (दुसरा), १६ अल्लाउद्दीन, (तिसरा), १७ वल्लीउल्लशाहा, १८ कलिमुल्लशाहा. असे १८ राजे झाले. शके १४४८ त हें राज्य अगदीं मोडलें. त्याचवर्षी दिल्लीस मोंगलांचें राज्य स्थापन झालें.

* त्यांपैकीं जीं हल्लीं यादेशांत चालू आहेत, त्यांतून कित्येक मुख्य मतांचें

आतां त्या त्या वेळचे अधिकारापन्न श्री मज्जगद्गुरु स्वतः व शिष्य द्वारें वादविवाद करून **श्रीमदाचार्य** स्थापित मताचा प्रसार करितच असत; परंतु काल, देश, वर्तमानानुरूप त्यांचे प्रयत्नांस यशाप

---

मा. पु.

एथें दिग्दर्शन केलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं, असें जाणून कांहीं लिहितों:-

१ **लिंगायत**- विजापूरचे पूर्वेस मुद्दे बिहाळ तालुक्यांत बागेवाडी ह्मणून गांव आहे, तेथें महादेव भट्ट नांवाचा आराध्य जातीय तैलंग ब्राह्मण राहत होता; त्याचा पुत्र "**बसव**" हा या मताचा स्थापक होय. ह्याचें जन्म शा॰ श॰ चे ११ व्या शतकाचे पूर्वार्धांत झालें. ह्यानें सुमारें शा॰ श॰ १०७६।७७ सालीं कल्याणचा जैन राजा विजलराज ह्याचा वध केला. व आपलें मत प्रसृत केलें. हें मत आराध्य ब्राह्मणांच्या धर्मांत थोडा फेरफार करून ठरविलें आहे, बसवाच्या हातीं राज्यकारभार होता; ह्या मतांत प्रथम जातिभेद नसल्यामुळें हीन जातीचे लोक ह्या मतांत एकदम पुष्कळ आले, राजाचा खजिना बसवाच्या हातीं असल्यामुळें लोकांस आश्रय देण्यास बसवाला ठीक पडलें, आणि ब्राह्मण व जैन ह्यांचे धर्मवाद त्या वेळीं ही चालले होते. सबब ब्राह्मणांस ह्या मताकडे लक्ष्य देण्यास फावलें नाहीं; ह्यावरील कारणांमुळें ह्या मताचा प्रसार झाला. ह्याबद्दल सविस्तर वर्णन **चन्नबसवपुराण** व **विजलकाव्य** ह्यांत पहावें.

२ **रामानुज**- ह्या मताचा स्थापक **रामानुजाचार्य**. हा शा॰ शकाचे आकराव्या शतकाचे अखेरीस मद्रास इलाख्यांतील श्रीपरंबतूर एथें जन्मला. ह्याचे संप्रदायी ह्यास शेषाचा अवतार असें मानितात. हें मत द्वैत प्रतिपादक आहे.

३ **रामानंदी**- (रामवत्)- हें मत रामानुजाचा पोट भेद आ-

यश- आलें, ह्यांत फारसें आश्चर्य नाहीं. असो,ह्याप्रमाणें धर्मस्थितिदे शभर बदलत चालली असतां शृंगेरी एथील गादीवर असलेले, दुसरे **विद्याशंकर भारती** हे धर्म स्थापनेचा व महा यात्रेचा उद्देश धरून कांहीं नियमित शिष्य मंडळी समवेत संचार करीत निघाले.

---

मा. पु.
हे. रामानंद प्रवासास जाऊन परत मठास आल्यावर त्याच्या गुरूनें त्यांजवर असा दोष ठेविला कीं," तूं फिरत असतां गुप्त रीतीनें भोजन करण्याचा नियम मोडला असशील" ह्या आरोपाला बाकीचे शिष्यांनीं अनुमोदन दिल्यावरून ह्यास राग येऊन ह्यानें हें मत स्थापिलें. ह्याच्या शिष्यांनीं पुष्कळ शाखा स्थापिल्या, त्यांत १२ मुख्य आहेत. **कबीर पिता** आणि **रवीदास** हे त्याच्या मुख्य शिष्यांपैकीं होते.

४ **माध्व-** रामानुजांच्या मागून ५० वर्षांनीं म्हणजे शा० शके ११६९ (सांप्रदाय प्रदीप पहा) सालीं **मध्वाचार्य** हे कर्नाटक प्रांतांत **उडपी** एथें जन्मले. ह्यांस **आनंदतीर्थ** असेंही नांव आहे. ह्यांस **वायूचा** अवतार असें मानिलें आहे."प्रथमस्तु हनूमानस्यात् द्वितीयो भीम एवच ॥ पूर्ण प्रज्ञस्तृतीयश्च भगवत्कार्य साधकः॥" हें मत द्वैत पंथाचें आहे,हें प्रसिध्दच आहे. यांत अंकन (मुद्रा) नामकरण (केशवादिनामें मनुष्यांस ठेवणें) व भजन असे भक्तीचे प्रकार आहेत.

५. **वल्लभ-** ह्या पंथाचे स्थापक **वल्लभाचार्य**, हे सुमारें शा० श० १४०१ ह्या वर्षी जन्मले. ह्याच्या मार्गाला **पुष्टिमार्ग** असें म्हणतात. हें मत प्रायः गुजराथेंत फार आहे. ह्या मतास शुध्दाद्वैत असें ही नांव आहे,पण **शंकराचार्य** स्थापित शुध्दाद्वैताचा व ह्याचा नामसादृश्याहून ज्यास्ति मेळ नाहीं.

६ **चैतन्य-** ह्या मताचा स्थापक **चैतन्य** नामक ब्राह्मण बंगाल प्रांतांत

निघते वेळीं शृंगेरी येथील संस्थानचीव्यवस्था आपण परत येई पर्यंत नीट राखून श्रीचंद्रमौलीश्वर शारदादेवीची पूजा अर्चा योग्य प्रकारें चालविण्याविषयीं संस्थानचे कारभाऱ्यांस व गांवांतील मुख्य* लोकांस त्यांनी

---

मा॰ पु॰

शा॰ शके १४०९ ह्यावर्षी जन्मला. ह्याने अद्वैत, नित्यानंद, हरिदास वगैरे शिष्य होते.

७ **स्वामीनारायणमत**- ह्याचा स्थापक **सहजानंद** (स्वामी नाराय ण) हा मागल्याच शतकांत **लखनौ** (लक्ष्मणावती) प्रांतांत जन्मला. ह्यानें **वल्लभ** पंथाला कंटाळून नव्यापंथाची स्थापना केली. हा **रामानंद** स्वामीचा शिष्यहोता. ह्याच्या मागून वैष्णवांत दुसरा पंथ झाल्याचें ऐकिवांत नाहीं.

८ **कबीरपंथ**- ह्याचा स्थापक रामानंद स्वामीचा शिष्य **कबीर** हा शके १०७० सालीं काशी मध्यें जन्मला. ह्या मताचे बरेच ग्रंथ आहेत त्यांत "**बीजक**" हा ग्रंथ मुख्य आहे. तो **कबीराच्या भगोदास** नामक शिष्यानें लिहिला.

९ **शैव**- (दंडी) हें मत उत्तरेकडे थोडथोडें आहे; बहुतकरून हिंदूंपैकीं सर्व जातीचे लोक ह्यांत असतात. ह्या लोकांत प्रेतें पेटींत घालून पुरण्याची रूढि आहे. ह्यांतील ब्राह्मणांस "**दशनामी**" ह्मणतात.

ह्या शिवाय **नाथ, कापालिक, मानभाव** वगैरे धर्ममतें हिंदूंत मोडणारीं नम्रुत होऊन, शिवाय **मुसलमान, शीक (नानक) ख्रिश्चन** वगैरे मतांचा ही फैलाव एथील प्रजेंत होऊं लागला, तो प्रसिद्धच आहे.

* प्रस्तुत देखील प्रत्येक देवस्थानची व्यवस्था पाहण्यास गांवांतील प्रमुख मंडळी नेमण्याची चाल कर्नाटक प्रांतांत व गोमांतक प्रांतांत आहे गोमांतक प्रांतांत असल्या मंडळीस "**कोमिसांव**" असें ह्मणतात.

सांगितलें. पुढें श्री विद्या शंकर भारती हे काशीस गेले व तेथें कांहीं दिवस वास करून पुढें बदरीकेदारास जाऊन हिमालयावर श्रीमदाचार्यांचे गुरु गोविंद भगवत्पूज्य पादाचार्य यांची गुंहा* आहे; ती ही पाहून यावें असें मनांत आणून उत्तरेकडे जावयास निघाले, तेव्हां समागमें आलेल्या शिष्य मंडळीस आज्ञा केली कीं, तुम्ही अमुक एक दिवस माझी वाट पहावी तितक्या दिवसांत मी परत आलों तर ठीकच आहे; नाहीं आलों तर तुम्हीं आपले पैकींच एकाला गुरु करून परत संस्थानीं जावें. व संस्थानचा अधिकार चालवावा.

पुढें शिष्य मंडळीनें गुरूंच्या आज्ञे प्रमाणें तेथें वास्तव्य केलें व आज्ञापिलेली मुदत होईपर्यंत मार्ग प्रतिक्षा केली. परंतु तितक्या नियमित कालांत गुरु कांहीं परत आले नाहींत म्हणून आपल्यापैकींच एकाला पूर्वाज्ञेनुरूप गुरु करून परत स्वदेशीं येण्यास निघाले. ते फिरत फिरत हरिहरचे दक्षिणेस अजमासें ३० मैलांवर तुंगा आणि भद्रा या पवित्र नद्यांचे संगमावर "कुडलगी" म्हणून गांव आहे, तथपर्यंत येऊन पोहोंचले. तोंहें वर्तमान पूर्वींच शृंगेरीस पोहोंचलें कीं, "श्री शंकर भारती" हे हिमालया परती गेले व ते तिकडेच समाधिस्थ झाले व बरोबर गेलेली शिष्य मंडळी आपसांत एक मुख्य (गुरु) करून परत संस्थानीं येत आहे. तेव्हां शृंगेरी एथील व्यवस्थापकांनीं विचार केला कीं, मुख्य गुरुतर

---

* माधव कृत शांकर विजयामध्यें, नर्मदातीरीं ही गोविंद यतींची गुहा असल्याचें वर्णन आहे

समाधिस्थ झालेच, आतां शिष्यांच्या अनुमताचा जो मनुष्य अधिकारी करावा त्यापेक्षां आपल्याला अनुकूल असा आपले मतें अधिकारी करावा. हें चांगलें व त्याप्रमाणें सर्व सर्व स्थ मुख्य मंडळीला अनुकूल करून घेऊन एका विद्वान् ब्राह्मणाला पुस्तकसंन्यास देऊन शृंगेरीचे गादीवर बसविलें व पूर्ववत् संस्थानचा कारभार चालविला.

इकडे **श्री शंकर भारती** हे हिमालयावरून गुरूंची गुहा पाहून, बदरी केदार, गंगोत्री, उत्तर मानस वगैरे तीर्थ क्षेत्रें पहात फिरून श्री क्षेत्र वाराणसी एथें आले तों थोडकेच दिवसांपूर्वी आपली शिष्य मंडळी आपली वाट पाहून नियमित दिवसांत आपलें येणें न झाल्यामुळें परत देशीं गेली. हें वर्तमान त्यांस कळलें व ते ही पूर्वसंकेतानुरूप यात्रा करीत दक्षिणेंत आले. कर्म धर्म संयोगें त्यांची व त्यांच्या शिष्य मंडळींची गांठ कुडलगी एथें पडली. तेव्हां शिष्यानीं संस्थानचें सर्व वर्तमान निवेदिलें. तें ऐकून शंकर भारती यांस फार आश्चर्य वाटलें व त्यानीं शृंगेरींतील प्रमुख मंडळीला या गोष्टीबद्दल विचारविलें. त्यानांही ह्या गोष्टीची पंचाइत पडली. पण आतां आपण जर ह्यांना मंठ्यानीं येऊं यावें व अधिकार कबूल करावा तर इतकी उलाढाल वगैरे ज्या अर्थी आपण केली आहे, त्या अर्थी आतां या पुढें आपले हातीं अधिकार राहून पूर्ववत आपलें महत्व राहील असा नियम नाहीं, तेव्हां जें आपण केलें तेंच कायम करावें असा विचार करून उलट निरोप पाठविला कीं, "एक गुरु विद्यमान असतां दुसरा शिष्य गादीवर स्थापन करावयाचा नाहीं, असा पूर्वी पासून नियम असून आपण ह्याविरुध्द वागलां ह्मणून आम्ही आतां आपणास शृंगेरी येथें येऊं देत नाहीं" याप्रमाणें शृंगेरी येथील मुख्याची कृतघ्नपणाची वाग-

मूक पाहून शंकर भारती यांस फार खेद आला, परंतु "विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुम सांप्रतं" अशा न्यायानें त्याच्या पारिपत्याविषयीं प्रयत्न न करितां कुडलगी एथेंच मठाची स्थापना करून राहिले. तथापि त्यांचे शिष्यांस ती गोष्ट सहन न होऊन, त्यावेळीं म्हैसूरचे गादीवर जो राजा होता त्याचे दरबारीं काम चालविलें; त्यावेळीं पक्ष परपक्ष ऐकून घेऊन ठराव केला. तो आलीकडे म्हणजे तारीख ३१ जानेवारी सन १८५५ इसवी रोजीं, इंग्रज सरकारचे रिकार्डासही रजिष्टर झाला आहे. तो असा "आदि शंकराचार्य परंपरा प्राप्त झालेले शृंगेरी स्वामी हे महा यात्रा देश संचारास जाण्याचा निश्चय करून गेलेवेळीं कांहीं दिवसांनीं या गांवचे महाजन वगैरे लोकानीं अस्ताव्यस्त समाचार उठवून दुसऱ्यास पुस्तक संन्यासाश्रम दिला. कांहीं दिवसांनंतर सदरीं लिहिलेले स्वामी हे कुडलगी स्थळास येऊन हें वर्तमान ऐकून हुजुरास येऊन, लिहून घेतल्यावरून उभयतांस आणून विचार केल्यावरून तेथील महाजन लोकांनीं हट्टानें पुस्तक संन्यासी केलेले खरें असा आमचा निश्चय झाला; तथापि उपदेश संन्यास विधि वगैरे यानीं द्यावा. पुस्तक संन्यासी यानी गांवांत राहून श्री शारदा मातुश्रीची पूजाराधना चालवून मठांत नेम निष्ठा करून रहावें. शंकराचार्य परंपरा प्राप्त झालेले स्वामी

---

* मूळ कानडीचें भाषांतर एथें लिहिलें आहे. १ त्यावेळीं "बेट्टदवडेयरु" हा राजा म्हैसूर एथें राज्य करीत होता. हा "हिरेचामराज" याचे मागून शके १४९८ यावर्षी गादीवर बसला. याचे मागून गादीवर बसलेला राजा "राज वडेयरु" यानें म्हैसूर एथून श्रीरंगपट्टण एथें शके १५३२ सालीं गादी आणिली.

यांनीं सर्व देशावर संचार वगैरे करून कुडलगीस रहावें, याप्रमाणें तह झाला आहे +++इ०" हा ठराव झाल्यानंतर ही कारण परत्वें अनेक प्रसंगीं विवाद होऊन शृंगेरी मठाचा अधिकार तुंगभद्रेच्या आलीकडे नाहीं असें अनेक वेळां ठरलें आहे. असो ह्याप्रमाणें श्री विद्या शंकर भारती ह्यांनीं कुडलगी येथें मठ स्थापना केली. व शिष्य वर्ग समवेत ते तेथें राहून सर्व प्रदेशांत अचार व्यवहारादि अधिकार चालवूं लागले. पुढें थोडक्या काळानें फिरून तीर्थ यात्रेला जावें असें मनांत घेऊन, पूर्वी ज्यांला आपुले आज्ञेवरून आश्रम झाला होता, त्याच शिष्यास कुडलगी येथील सर्व अधिकार सोपवून, आपण यात्रोद्देशें बाहेर पडले.

हें सर्व वर्तमान ऐकून कोल्हापूरचा सोमवंशी कृष्णरा*जा हा श्री स्वामीचे दर्शनास येऊन फार आग्रह करूं लागला कीं, करवीर क्षेत्र दक्षिणकाशी एथें येऊन स्वामीनीं निवास करावा व माझेकडून नेहमीं यथा शक्ति सेवा घ्यावी. तेव्हां

---

* श्री संस्थानचे दफ्तरीं जी केफीयत आहे, तींत सदरीं लिहिल्या प्रमाणें सोमवंशी कृष्णराय असा दाखला सांपडतो. पण ह्या कृष्णराजा विषयीं आलीकडील इतिहासांत वगैरे कांहीं माहिती अद्यापि प्रसिध्द नाहीं. "राष्ट्रकूट वंशांतील कृष्णराजाचा पराभव करून चालुक्य वंशांतील जयसिंहानें आपलें राज्य कोल्हापूर येथें स्थापिलें." असें इतिहासांवरून कळतें, पण वरील कृष्णराय हा हा नव्हे, हें शकावरून स्पष्ट आहे.

राजाची पुष्कळ प्रकारें श्रीनीं समजूत केली, तथापि त्याचा फार च आग्रह पडल्यावरून त्याचे मनोरथ कांहीं दिवस तरी पूर्ण करावे व नंतर काशीस जावें अशा उद्देशानें **श्री शंकर भारती** हे कुडल्गी येथून निघून उत्तरेकडे करवीर मार्गानें जात असतां मार्गांत संकेश्वरा नजीक **वल्लभ***गड ह्मणून किल्ला आहे ते-

---

* हा डोंगरी किल्ला संकेश्वराचे कांहींसा वायव्येस संकेश्वरापासून दोन मैलांवर आहे. हा कोल्हापूरच्या प्राचीन हिंदुराजानीं बांधिला. पुढें मुसलमानी अमलांत तो कांहीं दिवस त्यांचे ताब्यांत व कांहीं दिवस त्यांचेकडून वंटमुरीकर देसाई ह्यांचे ताब्यांत होता. पुढें मराठी राज्याचे भरभराटींत तो सातारचे राजांचे ताब्यांत आला व नंतर कोल्हापूर करांचे ताब्यांत सातार करांकडून आला. पण त्यांचे पासून ही पटवर्धनानीं घेतला. पुढें **सवाई माधव रावांचे** मागून **राव बाजींचे** अवेळीस जी गडबड झाली, तींत **परशराम भाऊ** गुंतले असतां, **नानानीं** धोंडोपंत गोखले व पटवर्धन ह्यांचे मुलखावर स्वाऱ्याकरण्या विषयीं आंतून कोल्हापुरकरांना फूस दिल्यावरून, त्यानीं इसवी सन १७९६ अखेर पटवर्धनाचा मुलूख घेतला, त्यांत हा किल्ला पुनः करवीरकरांकडे आला. करवीर करांचे चिकोडी, मनोळी तालुके जेव्हां इंग्रज सरकाराकडे आले तेव्हां अर्थात् हा किल्ला इंग्रज सरकाराकडे आला. संकेश्वर गांव वसण्याच्यापूर्वी एथंच वसती मोठी असे. हल्लीं जुजबी वस्ती आहे, लोक शेती भाती करणार आहेत. ह्याचें नांव "**वल्लभगड**" असें पडण्याबद्दल दंतकथा अशी सांगतात कीं, एके प्रसंगीं शिवपार्वती विनोदांत असतां पार्वती प्रेम कलहानें रुसून नेघाली ती

थें मुक्कामास उतरले व त्या किल्यावर पूर्वेचे आंगास जी हरिद्रा नामक देवी आहे, तिच्या दर्शनास गेले. तेथें देवीचा दृष्टांत असा झाला कीं, " तुम्ही काशीस न जातां एथेंच श्री (सांख्येश्वर) महास्थान आहे व कल्मषनाशिनी नदी आहे, तेथेंच श्री सांख्येश्वराची आराधना करून रहावें " असा दृष्टांत झाला त्यावरून श्री शंकर भारती हे कल्मष नाशिनी (हिरण्य केशी, हरण काशी) नदींतील शुक्ल तीर्थांत नेहमी स्नान करून श्री सांख्येश्वराची व देवीची आराधना करीत किल्यांत * देवी सन्निध राहिले.

---

मा. पु.
या पर्वतावर येऊन लपून बसली. पुढें शंकर विरहाकुल होऊन तिला शोधीत शोधीत आले, तों ती रुसून एथें बसलेली सांपडली. मग तिच्या समजुती करितां शंकर ही एथेंच राहिले. यास्तव " पार्वती वल्लभाचा डोंगर " असें ह्या डोंगराला लोक ह्मणूं लागले. कालांतरानें पार्वती शब्दाचा लोप होऊन " वल्लभ " शब्दानेंच व्यवहार होऊं लागला. व त्यावरूनच पुढें किल्याला ही वल्लभ गड असें नांव पडलें. देवीला "हरिद्रा देवी " असें नांव होतें, हल्लीं त्याचा अपभ्रंश "हरगमा" व हरिद्रापूर ह्याचा हरगापूर असा झाला आहे. एथून दोन ओढे निघतात. त्यांत एकाला गंगानाला व दुसऱ्याला गौरीनाला असें नांव आहे. (पुरवणीपहा.)

* ह्यांची राहण्याची मठी किल्याचे दरवाज्या जवळच सुमारें ५० हातांवर होती. हल्लीं तेथें त्यांची खूण चवथऱ्याचे दगड मात्र आहेत. त्या जागेवर कित्येकानीं घरें बांधिलीं पण नांदणूक झाली नाहीं; असें तेथील लोक सांगतात. तटाखालीं पूर्व बाजूस गुहा आहे, तिला "सि-

ह्यावेळीं दक्षिणेंत मुसलमानी धर्माचें प्राबल्य होत चा-
ललें होतें. विजापूरचा अली अदीलशहा, बेदरचा अलीबरीदशहा,
गोवळकोंड्याचा इब्राहिम कुतुबशहा, अहमदनगरचा हुसेन नि
जामशहा ह्या चार राजांनीं एकोपा करून शके १४८६ ह्यावर्षी वि
जय नगरच्या रामराजाचा पराभव करून त्याचा शिरच्छेद केला, व
हिंदुराज्याचें नयनाट करून, सुंदर देवालयें व मूर्ती ह्यांचा विध्वंस
केला. पुढें विजापूरचा अली अदिलशहा बादशहा, अदवान, बंका-
पूर, तोरगल, धारवाड वगैरे प्रांत घेत घेत उत्तरे कडे येत होता.
त्याचा रणदुलरखान नांवाचा सुभेदार (शके १४९१ ते १५३७) एके
वेळीं संकेश्वर एथें आला असतां त्यानें श्री शंकर भारती ह्यांचें दर्श
न घेतलें व स्वामीचें आचरण पाहून तो खुष झाला व त्यानें बादश
हा कडून संकेश्वर, अंकलें, कमतनूर वगैरे गांव श्री स्वामींस इनाम
करून देवविले. तेव्हां शंकर भारती ह्यांनीं पूर्व संकेतानुरूप करवि
रीं जाऊन राजाचे मनोरथ पूर्ण केले. तेथें राजानें पंचगंगातीरीं
एक मठ बांधून दिला व संकेश्वर एथें ही स्वामींनीं एक मठ स्था
पिला; आणि आचार्यांच्या "आसेतु हिमवच्छैलं सदाचाराम्वि
चारय" ह्या आज्ञे प्रमाणें धर्म वृद्धीचें काम चालविलें. हें वर्तमा
न शके १५००।१५०१ चे सुमारास घडलें.

ह्या प्रमाणें मूळ शंकराचार्य ह्यांजकडून शृंगेरीला जी-
मठ स्थापना झाली व ज्या गादीवर आचार्यांच्या शिष्य परंपरेनें अधि

---

मा. पु.
ध्दन गुहे" (सिध्दाची गुहा) असें अद्यापि नांव चालू आहे.

* बेळगांव ग्याझिटियर पहा.

कारी होत गेले, त्या गादीचा मुख्य अधिकार करवीर मठाकडे आला व मागच्या पुष्कळ सनदा पत्रांत देखील ह्या करवीर मठाला शृंगेरी मठ असेंच ह्मणून कागद पत्र झालेले आहेत. त्याचप्रमाणें प्रस्तुतचे बिरुदावळींतें ही वरील हकीगतीला अनुसरूनचं "ऋष्यशृंगपुरवराधीश्वर" इत्यादि विशेषणें ही आहेत हें स्पष्ट आहे. आतां शांकर विजयादि ग्रंथांमध्यें करवीर मठाचे संबंधानें कांहीं माहिती असण्याचा संभवच नाहीं. कारण ते ग्रंथ केवळ आचार्यांचेच इतिवृत्ताबद्दल असून, ह्या मठस्थापनेच्या पूर्वींचे आहेत. तेव्हां त्या ग्रंथांचे मागून ज्या गोष्टी घडल्या, त्यांबद्दल त्यांत माहिती कशी असेल? पण हल्लीं, शृंगेरी मठ मुख्य व त्याची शाखा करवीर मठ वगैरे जी कित्येकांची समजूत झालेली आहे, ती वरील हकीकतीवरून गैर माहितीची आहे हें सुज्ञ वाचकांच्या सहज लक्षांत येणार आहे. सदरील माहिती करवीर मठामध्यें फुटकळ फुटकळ लिहिलेली होती, पण ती हल्लींचे रीतीप्रमाणें योग्यवेळीं प्रसिध्द होऊन लोकांना कळली नाहीं, तेव्हां याबद्दल लोकांकडेही दोष देणें वाजवी नाहीं. शिवाय करवीर मठ एकदां जळला होता (याबद्दल सविस्तर माहिती पुढें दिली आहे.) त्यांत बरेच महत्वाचे कागदपत्र नाहींसे झाले, त्यास तर कांहींच उपाय नाहीं!! पण सत्य दृष्टीनें जो पाहणार आहे, त्याचा विचारांतीं करवीर मठच "अविच्छिन्न गुरूपरंपरा प्राप्त" आहे असा निश्चय झाल्यावाचून कदापि राहणार नाहीं. आतां अधिकारापन्न व्यक्तिविशेषांच्या गुण दोषांत जरी तारतम्य भाव असला तरी त्यांच्या योगानें पूर्व वृत्तांतास बाध येऊं शकणार

नाहीं, हें कोणीही विचारी मनुष्य कबूल करील; आणि ह्यासाठीं व आपले पूर्वज आजपर्यंत याच मठाचें शिष्यत्व अनन्य भावानें करीत आले आहेत, त्या अर्थी आम्हां सर्व एतद्देशीयांस तर या करवीर मठाचा पूर्ण अभिमान असणें हें सर्व गोष्टींनीं श्रेयस्कर आहे. काहीं व्यवहारिक कारणांस्तव कित्येक हल्लीं भेदभाव उत्पन्न करीत आहेत असें प्रस्तुतचे कित्येक उलाढालींवरून दिसतें, पण अशा कृतीनें आधींच शिथिल झालेल्या धर्मबंधनाचा अगदींच बोजवारा उडेल व मग तो कोणाच्याच हातीं राहणार नाहीं; अतएव प्रत्येक व्यक्तीनें धर्माच्या कामाला असे विक्षेप न आणितां केवळ सत्य स्मरून त्याचें संरक्षण करावें असा न हल्लींचा प्रसंग आहे. तो शक्त्यनुसार सांभाळावा. कांकीं, "शक्तोयः स्थापितुं धर्म मुपेक्षां कुरुते नरः॥ सोऽसि पत्रवनंनाम नरकं प्रतिपद्यते॥ (सुत संहिता) असें शास्त्र आहे; असो. तर त्या प्रमाणें श्री विद्याशंकर भारती ह्यानीं शृंगेरी एथील मठाची मुख्य गादी करवीर एथें करून सर्व अधिकार करवीर एथें चालविला, व शिक्का मोर्तब सुध्दां नवीन केलें तो शिक्का असा- "अनेक शक्ति संघट्ट प्रकाश लहरी घनः॥ ध्वांत ध्वंसो विजयते विद्या शंकर भारती"॥ व हाच हल्लीं या संस्थानांत चालू आहे.

आता ह्या श्री विद्याशंकर भारतीं पर्यंत जी क्रमानें शिष्य परंपरा आली आहे, ती येथें सांगतों, म्हणजे सर्व सरळ संबंध लक्षांत येईल. ह्यांतील सदरीं लिहिली आहे ह्याखेरीज प्रत्येक पुरुषाबद्दल माहिती मिळाली नाहीं, त्यास उपाय नाहीं! अद्यापि ही जास्त शोध मिळेल तर पुढें नमूद करितां

येईल या करितां सर्व जिज्ञासु व शोधक वाचकांस एवढी विनंति करून आतां शिष्य परंपरा लिहितोंः-*

मूळ सर्व गुरु शंकर, त्यापासून विष्णु, त्याचा ब्रह्मा, त्याचा वसिष्ठ, त्याचा शक्ति, त्याचा पराशर, त्याचा व्यास (कृष्णद्वैपायन) त्याचा श्रीशुक, त्याचे गौडपाद, त्याचे गोविंद यति, पुढें क्रमानेच श्रीमच्छंकराचार्य, सुरेश्वराचार्य (विश्वरूपाचार्य), पृथ्वीधर भारती, गंगाधरभारती, चिद्घनभारती, बोधघनाचार्य, ज्ञानोत्तमभा-

---

* ही शिष्य परंपरा संकेश्वर मठांत फार जुनी लिहिलेली सांपडली, पण ती अतिजीर्ण असल्यामुळें सर्व अक्षरें स्पष्ट दिसत नव्हतीं; पुढें शोधकरितां श्रीक्षेत्र कऱ्हाड येथें वे. शा. स. रा. महादेवभट्टजी वळवडेकर अग्निहोत्री व सखारामभट्ट दवळीकर यांचे संग्रहीं एकेक प्रत सदर गुरु परंपरेची सांपडली. त्यांवरून ही संकेश्वरची प्रत खरी करून घेतां आली. त्यांतील थोडा उतारा वाचकाकरितां येथें घेतों.

" नमामी शंकराचार्य गुरुपाद सरोरुहं॥ यस्यप्रसादान्मूढोऽपिसर्वज्ञः सर्वदाभवेत्॥आदौशिवस्ततो विष्णुस्ततोब्रह्मा ततः परं॥ वसिष्ठाख्य स्तत शक्ति स्ततः पाराशरः स्मृतः॥ ततोव्यासः शुकः पश्चा द्गौडपादाभिधस्तथा॥ गोविंदार्य गुरुस्तस्मा च्छंकराचार्य संज्ञकः॥ विद्यापीठादिकं कृत्वा भारती संज्ञयागुरुः॥ अगच्छत्स्वेच्छयाकांची पर्यटन् पृथ्वीतले॥ तत्र संस्थाप्यकामाक्षींजगामपरमंपदं॥ विश्वरूपयतिंस्थाप्य स्वाश्रमस्यप्रचारणे॥ स्वयंकाञ्चींगतस्तस्माच्छ्रीपृथ्वीधरभारती॥ ततोगंगाधरयतिस्ततश्चिद्घनभारती॥ ततोबोधघनोमौनी ततोज्ञानोत्तमो गुरुः॥ तस्मान्नृसिंहयतिराट् तत ईश्वरभारती॥ तस्माद्विद्याशंकराख्योयतिः कृष्णयतिस्तथा॥ तस्माच्छंकरयोग्यासीन्मधुसूदनभारती॥ तत आसीत्स्वयंजातः सच्चिदानंद भारती॥ पुरुषोत्तमयोग्यासी ततोभून्मधुसूदनः॥ गुरुस्ततोजगन्नाथोविश्वानंदयतिस्तथा॥ तस्माच्च विमलानंदो यो विद्यारण्यभारती॥ ततो ज्ञानोत्तम यतिस्तत ईश्वर भारती॥ ततः ईश्वरतीर्थश्चविद्यातीर्थ स्तथैवच॥ विद्यारण्योनृसिंहश्चचंद्रसेखरभारती॥ रामचंद्रोनृसिंहश्चविद्यातीर्थस्तथैवच॥ नृसिंह

रती, नृसिंह भारती, ईश्वरभारती, विद्याशंकरभारती, कृष्ण भारती, शंकरभारती, मधुसूदन भारती, स्वयंजात भारती, सच्चिदानंद भारती, पुरुषोत्तम भारती, मधुसूदनभारती, जगन्नाथभारती, दिव्यानंद यति विमलानंदभारती (विद्यारण्य ज्ञानोत्तम यति, ईश्वरभारती, ईश्वरतीर्थ, विद्यातीर्थ, विद्यारण्य, नृसिंह भारती, चंद्रशेखरभारती, रामचंद्र भारती, नृसिंह भारती, विद्यातीर्थ, नृसिंह शंकरानंद, नृसिंह शंकर, विद्यानरसिंहभारती आणि विद्याशंकरभारती हेंच संकेश्वर येथें आले. हे मूळ आचार्यापासून ३४ वे होतात. यांत प्रत्येकाची कारकीर्द किती वर्षे वगैरेचा दाखला कांहीं मिळत नाहीं. येथपासून पुढें क्रमानेंच विद्यानरसिंह भारती व विद्याशंकरभारती अशी परंपरा सुरू झाली, त्याप्रमाणेंच अद्यापि चालू आहे. या शंकरभारतीस देव गोसावी असेंही म्हणत असत. यांचे कारकीर्दीत संकेश्वर, अंकले वगैरे गांव बादशाहींतून इनाम मिळाले. हें वरती लिहिलेंच आहे. त्यावेळीं त्यागांवांतून फारशी वसाहत नव्हती. मठांची वगैरे स्थापना झाल्यावर थोडेच वर्षांनीं हे शां-

---

(मा. टी.) शंकरानंदो नृसिंह शंकरस्तथा ॥ नृसिंहभारतीनाथ पश्चाच्छंकर भारती ॥ यः शुचिः प्रातरुत्थाय संपठेत् ॥ आयुरारोग्यमैश्वर्यं लभते नात्र संशयः ॥ यस्तु द्वैतमतेस्थित्वा भारती पीठनिंदकः ॥ स याति नरकं घोरं यावदिंद्राश्चतुर्दश ॥ इ० इ०

आलीकडे शृंगेरी मठाची गुरुपरंपरा प्रसिद्ध झाली आहे, पण तिचा वरील परंपरेशीं मेळ नाहीं; कांहीं नांवें मात्र मिळतात.

मि. राईस यांनीं मद्रास व कुर्ग यां बद्दलची माहिती प्रसिद्ध केली आहे, तीन ३३० पानावर शृंगेरीचे गुरूंची यादी दिली आहे त्यांत विश्वरूपाचार्य व शंकरभारती यांचीं नांवें दिसत नसून शंकरानंद भारती असें नांव आहे. (वे. न्या.)

करभारती श्रीक्षेत्र करवीर येथें समाधिस्थ झाले- समाधिस्थान शुक्रवार वेशीचे आंतले अंगास आहे- यानीं आपले समाधिसमयीं ज्यास उपदेश दिला ते पहिले तैलंगस्वामी अशा नावानें प्रसिद्ध आहेत- आश्रमसंबंधीं विद्यानरसिंह भारती असें त्यांचें नांव होतें- यांचे मागून लाटकर, काशीकर व आष्टेकर हे क्रमानेंच विद्याशंकरभारती, विद्यानृसिंहभारती व विद्याशंकरभारती या नांवानें अधिकारापन्न झाले- या प्रत्येक कारकीर्दीचा त्राक मिळत नाहीं पण शके १६७९ या वर्षी शंकरभारतींनी (आष्टेकर) कारकीर्द पुरी झाली असा दाखला आहे- असो,

या एकंदर कारकीर्दीत शके १६२५ सालीं मौजे दारवाड तर्फ खानापूर हा गांव संकेश्वर व कोपेश्वर संस्थानाकडे चालण्याविषयीं महाराज सरकारांतून सनद मिळाली- तसेंच मौजे खेबवडें हा गांव शके १६३४ सालीं अन्नसत्राबद्दल मिळाला. मौजे हिटणी कर्यात नूल हा गांव शके १६३९ सालीं बादशाहाचा सुभेदार महंमदखान यानें श्रीशंकरभारती यास इनाम दिला- तसेंच मौजे बल्लोली हा गांव हिंदुराव घोरपडे मलकतमदार यांजकडून अन्नसंतर्पण व धर्मकृत्याबद्दल शके १६४२ सालीं मिळाला- पुढें त्याबद्दलची सनद शके १६४६ सालीं शाहूमहाराज यांणीं दुमाला करून दिली- त्याचप्रमाणें मौजे केसापूर* कसबे करवीर हा गांव शके १६४१ सालीं श्रींचे उत्साहा

*हल्लीं करवीर मठ आहे त्याचे नजीकचे पेठेला "केसापूर" असें पूर्वी म्हणत असत- हल्लीं ती करवीर सरकारचे ताब्यांत असून त्याबद्दल संस्थानीं नक्त उत्पन्न येत असतें.

बद्दल व मौजे कोर्पेवाडी तालुके आजरें हा गांव शके १६७४ सालीं असे दोन गांव शंभू छत्रपति यांजकडून मिळाले.

"शृंगेरी मठाधिपतींनीं तुंगभद्रेचे पलीकडे श्रीची पूजा करून असावें, व गुरुपरंपरा प्राप्त झालेले यांनीं देशावर संचार करून आचार व्यवहारादि धर्मावलोकनाचा अधिकार चालवावा" असा तह ठरल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. पुढें श्रीविद्याशंकरभारती हे आपले शिष्यास कुडलगी येथें ठेवून आपण करविरीं आल्यानंतर तो कुडलगीमठ व करवीर मठ बरेच वर्षे एकरूपानें होते. पण पुढें जसजशी शिष्य परंपरा होत गेली तसतशीं पूर्वीची ऐक्य बुद्धी जाऊन अधिकाराचे संबंधानें कुडलगी व संकेश्वर या मठामध्यें वारंवार विवाद होऊं लागले. एकदा सातारकर श्रीमंत संभाजी महाराज छत्रपति यांचे वेळीं असा विवाद उत्पन्न होऊन, उभयतां श्रीच्या स्वाऱ्या साताऱ्यास आल्या. तेव्हां राजे यानीं मध्यस्थी करून उभय मठाची हद्द मलापहारी ठरवून तिचे उत्तेरेस अधिकार संबंधानें कुडलगीकरांनीं येऊं नये असें सर्वानुमतें ठरविलें. पुढें शाहू महाराज गादीवर असतां म्हणजे करवीर सिंहासनावर श्रीविद्यानरसिंह भारती असतां, पुनः तोच वाद उपस्थित झाला, व सरकारांत गेला. तेव्हां महाराजांनीं पूर्वीच्या ठरावानुरूप ठराव करून त्याप्रमाणें विनंति पत्र लिहिलें; तें—"सतत कृपास्पद राजा शाहू छत्रपति विरचितानेक दंडप्राय विनंति विज्ञापना अत्रत्य कुशल तागायत कार्तिक बहुल प्रतिपदा

---

*: या पत्रावर शक नाहीं पण सदर मितीस झालेल्या इतर सनदा सन शक ४१ म्हणजे शके १६८७ सालच्या आहेत. यावरून हें पत्रही शके

इंदुवार पर्यंत सकल वृत्त यथास्थित असे विशेषस्तु- श्रीस्वामी कुंडलगीकर हे संचोरोद्देशें सातार मुक्कामी आले हें वर्तमान मठकरवीर येथें समजल्यावरून श्रींचें आगमन करवीराहून साताऱ्यास समस्त ब्रम्हवृंदासहित होऊन आज्ञा झाली कीं, कुंडलगीकर स्वामी यांनीं संचार करण्याचा अधिकार नसतां आले याचा विचार झाला पाहिजे; त्याजवरून समस्त ब्रह्मवृंदाचे विचारें कुंडलगीकर यांचा पूर्वापार विचार समजून घेतला असतां कुंडलगीकर यांनीं संचार करावयाचा अधिकार नाहीं असें ठरलें- त्यास कुंडलगीकर हे आमचे ठिकाणीं आले त्याजवरून श्रीस विनंति करून मलापहारीची हद्द ठरवून दिली आहे- तर तुंगभद्रा व मलापहारीचे मध्यें कुंडलगीकर यांनीं असावें- आलीकडे येऊं नये. कुंडलगीकर याप्रांतीं आले असतां सर्वत्रांनीं पूजा करूं नये व आम्हीही पूजा करणार नाहीं- याप्रमाणें ठरवून दिलें असें श्रीचें व समस्त क्षेत्रस्थ ब्रह्मवृंद यांचे विचारें नियम ठरला- त्याप्रमाणें कुंडलगीकर यांनीं असावें- बहुतकाय लिहिणें ही विज्ञापना." असो, याप्रमाणें या तीन कारकीर्दी होऊन श्रीविद्याशंकरभारती (आष्टेकर) यानीं फाल्गुन शुध्द १ शके १६७९ रोजीं वे- शा- रामशास्त्री नूलकर यास उपदेश देऊन श्रीविद्यानरसिंहभारती असें सांप्रदाईक नांव ठेविलें व सर्व संस्थानचा अधिकार दिला- पुढें हे अधिकारपन्न झाल्यावर थोड्याच महिन्यांनीं श्रीशंकरभारती हे समाधिस्थ झाले- यांची समाधि पंचगंगा नदी तिरीं आहे- प्रतिवर्षी

---

(मा- टी-) १६८७ सालीं झालेलें असावें- अशा विनंतिपत्रावर शिक्का वसन असत नाहीं असें पूर्वींचीं पत्रें पाहिलीं असतां दिसतें.

पौष मासीं येथें तीन दिवस उत्साह होत असतो.

हल्लीं ज्यास **खिद्रापूर** ( पृ-२१ पहा.) म्हणतात त्या गांवाचे पूर्वीचें नांव वाडीकोपेश्वर असें होतें व श्रीकोपेश्वर देवाकडेच तो गांव चालत असे. पुढें तेथें खिदरखान फणी म्हणून एक मुसलमान सरदार प्रबळ होऊन गांव बळकावून बंडावा करूं लागला. तेव्हां तें त्याचें बंड **यमाजी रुद्रो** नेरलीकर यानीं मोडून गांव आपले ताब्यांत घेतला, पण कोल्हापूरकर व पटवर्धन वगैरे तो आपणास पचूं देणार नाहींत असा विचार करून नेरलीकर यांनीं तो गांव श्रीस्वामीस अर्पण केला. हें वर्तमान कोल्हापुरी श्रीमंत **शंभु** छत्रपती यांस कळल्यावरून त्यांना फार संतोष झाला व त्यांचे कडून सदर गांवाबद्दल शके १६८१ सालीं श्रीचें नांवें सनद मिळाली. हल्लीं तो गांव संस्थानाकडेच आहे व देवस्थानचा सर्व बंदोबस्तही संस्थानांतून होत असतो. या शिवाय **हळदी, वाटंगी** व **बारवें** हें गांवही हुजूर सनदेवरून मिळाले. या ( तुलकर ) **नरसिंहभारतीनीं** शके १६८९ माघ वद्य १३ रोजीं वेदमूर्ति रा० **यज्ञेश्वरभट मुतनाळकर** यांस उपदेश देऊन सर्व अधिकार यांचे हातीं सोंपविला. त्यांस **शंकर भारती** असें आश्रम नांव मिळालें हें सांगणें नकोच. पुढें गुरुस्वामी (नरसिंहभारती) हे शके १६८९ माघ वद्य ३० रोजीं श्रीक्षेत्र **नरसिंहवाडी** येथें समाधिस्थ झाले. येथेंही संस्थानांतून दरसाल उत्साह होत असतो या नरसिंह भारतीची कारकीर्द ९ वर्षें होती.

या (मुतनाळकर) शंकर भारतीचे कारकीर्दींत कोन्हेरराव त्र्यंबक पटवर्धन यांचा करवीर मठावर हल्ला होऊन शके १६९५ सालीं मठ

जळाला. तो प्रकार असाः—

कोल्हापूरकर व पटवर्धन यांचा मुळापासून द्वेष होता खरा, पण तो द्वेष प्रथम त्यांचे स्वतःचे संबधानें नसून, पेशव्यांचे हुकूमावरून पटवर्धनाला कोल्हापूरकरांशीं भांडावें लागत असे. रघुनाथ राव दादा व नानाफडणवीस वगैरे इतर मुत्सद्दी यांचे जेव्हां पेशवाईचे गादीविषयीं तंटे चालले होते, तेव्हां रघुनाथ राव दादा साहेब यांनीं हैदर अल्ली व कोल्हापूरकर यांशीं वळण बांधिलें, अर्थात कोल्हापूरकरांनीं रघुनाथरावाला सहाय्य करण्याच्या निमित्तानें पेशव्यांचे व त्यांचे पक्षपाती संस्थानिक यांचे मुलखास उपद्रव देण्यास सुरुवात केली. तेव्हां कोन्हेरराव त्र्यंबक पटवर्धन (कागवाडचे घराण्याचे मूळ पुरुष) हे बरोबर प्रधान राव प्रतिनिधि वगैरे सरदारांस कुमकेस घेऊन कोल्हापूरकरांचे मुलखांत शिरले व त्यांचे फौजेची दाणादाण करून थेट राजधानीवर शिस्त धरली. तेव्हां कोल्हापूरकराचे दिवाण एसाजी शिंदे हेच स्वतः सेनापति होते, त्यानीं पराकाष्ठा केली तथापि कांहीं उपाय न चालतां कोन्हेरराव वेशीपर्यंत येऊन मोर्चेबंदी करून कोल्हापुराला वेढा देऊन बसले; व सात दिवसांत बाहेरील सर्व पेठा आपल्या ताब्यांत घेतल्या. यांचे पूर्वीही जेव्हां जेव्हां पटवर्धनाचे हल्ले कोल्हापुरावर होत, तेव्हां तेव्हां लुटीचे भीतीनें बहुतेक लोक श्रीचे मठाचे आश्रयास जात व आपले प्राण आणि वित्त यांचे संरक्षण करीत; कांकीं मठाची मर्यादा राखून मठाचे वाटेस कोणी न जाण्याविषयीं पटवर्धन सरदार फार

बंदोबस्त ठेवीत असत. त्या भरंवशावर, या प्रसंगीं सर्वच गोरगरीब शेट सावकार वगैरे मठाचे आश्रयास गेल्यामुळें शहरांत पटवर्धनास कांहींच लूट सापडली नाहीं. तेव्हां शहरचे लोकांस मठांतून बाहेर लावून देण्याविषयीं पटवर्धनानीं श्रीस्वामीची फार विनंति केली; पण शरण आलेल्यांस शत्रूच्या स्वाधीन करणें हें उचित नव्हे असें जाणून स्वामीनीं पटवर्धनाची विनंति मान्य केली नाहीं ॰॰ "तेव्हां हा सर्व प्रकार कोन्हेररावांनीं हुजूर पुण्यास लिहिला व तिकडून लिहून आल्यावरून मठ लुटण्यास लष्करास हुकूम केला." तेव्हां फौजेनें मठ लुटून व जाळून जमीन दोस्त केला. त्यांत कोन्हेररावाला पुष्कळ लूट सांपडली. त्या पेकीं कांहीं मो-

---

॰॰ "–" या चिन्हांत लिहिलेली व पुढें लिहिलेली माहिती श्री. बापूसाहेब कुरुंदवाडकर यांजपासून मिळाली. ताराबाईनें कोल्हापुरीं स्वतंत्र राज्याची स्थापना केली, पण जे सातारचे गादीचे एकनिष्ठ सेवक होते ते ती गोष्ट कबूल करीत नसत. एकदा बाजीराव पेशवे साहेब हे राजापूरचे गंगेस आले होते, त्या वेळीं कोल्हापूरकरांनीं आपले मुलखांत त्यांची उत्तम प्रकारें बडदास्त ठेविली व पेशव्यास कोल्हापुरीं भेटीस बोलाविलें. ती गोष्ट बाजीराव साहेबांनीं मान्य केली व ते कोल्हापूर सरकारचे भेटीस गेले. तेव्हां कोल्हापूरकरांचें बोलणें पडलें कीं, सातारकर महाराज यांस जो मान पेशव्यांकडून मिळतो तो मान आम्हांस मिळावा पण ती गोष्ट पेशव्यांनीं अमान्य केली; त्यांचें म्हणणें सातारकर सार्वभौम आहेत व कोल्हापूरकर त्यांचे मांडलीक आहेत, सबब आम्हीं त्यांस सातारचे महाराजांचे बरोबरीचे मानणार नाहीं. तेव्हां ही गोष्ट करवीरकरांना विषम वाटून उभयतां मध्यें विरोध वाढला. त्यामुळें करवीर करानां जास्त वाढूं न देण्याविषयीं पटवर्धनानां पेशव्याकडून हुकूम येत असत म्हणून त्यास वारंवार कोल्हापूरकराबरोबर पुढे करावी लागत. तेव्हां त्या पेशव्याच्या शाळी वरून पाहिलें अस-

त्यावर् वस्तु अद्यापि पटवर्धनांचे येथील कैलास आहेत व पार्वतेचें चंद्रमौळीश्वराचें नित्यपूजे-चें लिंग जमखिंडीकरांचे संग्रही आहे असें समजतें. हें जें मठाचें नु-कसान झालें त्यापेक्षां मठांतील जुनीं दफ्तरें, पुस्तक संग्रह यांचा नाश झाला हें अति मोठें नुकसान झालें व तें आतां कोणत्याही उ-पायानें भरून येण्याचा संभव नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट आ-हे. असो!

या प्रमाणें पटवर्धनांनीं पेशव्याचे हुकुमाप्रमाणें कोल्हापूरक-रांची रग जिरवून एकीकडून स्वामीभक्ति दाखविली खरी, पण त्या कृत्यांत दुसरीकडून स्वामीद्रोह त्यांचे पदरीं आला. म्हण-जे वरती लिहिल्याप्रमाणें मठाची धूळधाण होऊन लोकांचा आकांत झाला हें पाहून स्वामीस अतिशय वाईट वाटलें व क्रोधही आला; आणि भरदोनप्रहरीं उन्हानें लाही होत असतां ते कोल्हापूर सोडून पायींच चालते झाले. ते सातारजिल्ह्यां-त वाळव्याजवळ कृष्णेच्या पलीकडे 'शिरगांव' म्हणून गांव आहे, त्या गांवीं कृष्णातटाकींच सिद्धेश्वर म्हणून स्वयंभू जागृ-त स्थान आहे; त्या ठिकाणीं येऊन, देवाचे भक्तीपुरःसर अर्चन क-रून, आतां येथेंच आपण सिद्धिंगत होणार असें मंडळीला सां-गितलें. तेव्हां आश्रितांनीं व इतर मंडळीनें पुष्कळ आग्रह क-

---

(मा-टीप.)

तां कोल्हापूरचें राज्य कदाचित् त्यांनां घेतां आलें असतें, पण वरून जरी निकराचीं युद्धें होत तरी "राज्य मोडूं नये तह करून नम्र करावे" अशी पेशव्यांची आंतून पटवर्धनानां पत्रें आलेलीं हल्लीं सांपडतात. असें के-ल्याचा उपयोग हल्लीं दिसतच आहे कीं तसले बलिष्ठ पेशवे प्रस्तुत नाम शेष

रून असें न करण्याविषयीं फार विनंति केली पण तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं श्रीनीं तेथें श्रीसिद्धेश्वरासन्मुख होऊन जीवत्समाधि घेतला. हें वर्तमान शके १६९५ पौषवद्य १२ रोजीं झालें.* समाधीस्थानांतून दुसरे दिवशीं अश्वत्थाचीं तीन रोपें उगवलीं. त्यांचेंच आतां मोठें त्या ठिकाणीं झाड झालें आहे. ह्या ठिकाणीं वाडी, औदुंबर वगैरे स्थानाप्रमाणेंच कांहीं सेवेकरी वगैरे असतात, कित्येक नवस करितात, कित्येक परमार्थ बुद्धीनें सेवा करितात; असो, लोकांचे सोईकरितां एक धर्मशाळा संस्थानांतून बांधिलेली आहे. प्रतिवर्षीं वैशाखमासीं उत्सव होत असतो. ह्या उत्साहाकरितां थोरातांकडून मौजे पोखरणी हा गांव इनाम आहे व मौजे बावची येथें १७॥ बिघे जमीनही तशीच आहे. हा गांव मिळाल्यावर उत्साहास प्रारंभ झाला, तो वैशाखमासीं झाला. सबब अझून तसाच चालला आहे. वास्तविक म्हटलें तर पौषमासी हा उत्साह व्हाव-

( मा. टी. )
झाले, पण करवीरचें राज्य कायमच आहे !

* रा. रा. मोडक यांनीं केलेल्या इतिहासांत सदरील गोष्ट शके १६९७ सालीं झाली असें लिहिल्याचें दिसतें; पण या संस्थानीं दाखला शके १६९५ सालचा आहे. तसेंच स्वामीची समाधी "शेणगाव" येथें आहे असें लिहिलें आहे. पण शेणगांव हें भुदरगड पेट्यांत असून तेथें कांहीं तसा प्रकार झाल्याचें दिसत नाहीं. त्यांनीं जेथून माहिती घेतली असेल तेथून खरी मिळाली नसेल, किंवा हस्त दोष असेल !

याचा.

श्री स्वामीनीं जिव्हा हांसडून प्राणत्याग केला, तासगांवाकडे तोंडकरून प्राण सोडिले, कागवाडकरांना शापिलें वगैरे गोष्टी लोकांचे बोलण्यांत आहेत, पण शिरगांवीं जाऊन माहितगार मनुष्यांकडे चौकशी केल्यांत, त्यांतील कांहीं प्रकार निश्चय झाला नाहीं. कर्मधर्म संयोगानें तासगांव व कागवाड या दोनही संस्थानची पुढें वाताहात झाली त्यावरून लोकांचा ग्रह सदरप्रमाणें झाला असावा? व तसा होणेंही सहाजीक आहे.*

याप्रमाणें सदरील **शंकर भारती** यांची कारकीर्द पांच वर्षे दहा महिनें झाली. यानीं आपले समाधीचे पूर्वी ७।८ महिने म्हणजे ज्येष्ठ वद्य २ शके १६९५ रोजीं हरी शास्त्री नांदेडकर यांस आश्रम देऊन शिष्य केलें होतें व त्याचें नांव **नरसिंह भारती** असें ठेविलें होतें. ते अधिकाराचें काम पाहूं लागले. यांचे कारकीर्दीत विशेष गोष्ट कांहीं झाली नाहीं. हे शके १६९८ चैत्र वद्य ७ रोजीं वे. रा. बाबदेव भट लाटकर यांस आपले जागीं स्थापून आपण वैशाख वद्य ६ शके मजकुरीं समाधिस्त झाले. यांची कारकीर्द अवघी २ वर्षे ११ महिन्याची झाली.

या ( **लाटकर** ) **शंकर भारतीचे** कारकीर्दीत शके १७०३ सालीं मौजे **पोरवणी** तालुके आष्टे हा गांव शिरगाचे समाधीचे उत्साहाबद्दल इनाम मिळाला व उत्साह सुरू झाला. या कारकीर्दीतही पूर्वी शाहू महाराजांनीं वगैरे ठरविलेल्या नियमाचे विरुद्ध

* आमच्या कविकुल गुरूंनी ही वरच्यासारख्या प्रसंगाला भिडून आपल्या चक्रवर्ती नायकाला देखील साधधारवीले आहे पहा – "शमप्रधानेषु तपोधनेषु गूढं हि दाहात्मकमस्ति तेजः॥ स्पर्शानुकूला अपि सूर्यकान्ता स्तदन्य तेजोभिभवाद्वमन्ति ॥" शा. अ. १.

शृंगेरीकर, कुडलगीकर वगैरे यांस संस्थानचे हद्दींत येऊन संचार करण्याचा प्रयत्न करूं लागले. तेव्हां श्रीकडून पुण्याचे दरबारीं लिहून गेल्यावरून तिकडून सदरील गोष्टीचा बंदोबस्त करण्याविषयीं परशुराम भाऊ पटवर्धन यांस लिहून गेलें कीं, "राजश्री याविराजित राजमान्य राजश्री परशुराम रामचंद्र स्वामी गोसावी यांसी, पोष्य माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. गोकर्णापासून कोकणांत व मलापहारी उगमापासून संगमास येऊन तेथून तुळजापूर व नागपूर व ग्वाल्हेर, दिल्ली वगैरे वरून उत्तरेस जाणेचे मार्गाप्रमाणें देशांत अधिकार करवीर श्रीशंकराचार्य यांचा असतां यांचे अधिकारास मलापहारी आलीकडे कर्नाटकांत शृंगेरी वगैरे श्रीशंकराचार्य हे खलेल करितात म्हणून हुजूर विदीत झालें. त्याजवरून हें पत्र लिहिलें असे तर शृंगेरी वगैरे श्रीशंकराचार्य यांस नवीन करून देतां करवीर श्रीशंकराचार्य यांजकडे पूर्वापार चालत आल्याप्रमाणें चालविणें जाणिजे. चंद्र १५ जमादिलावल सुरुसन आर्बासमानीन मय्या व अल्लफ-बहुत काय लिहिणें ही विनंति." असें होतें.

या वेळीं टिपूनें खंडणीसंबंधीं कुरापत काढून नरगुंदास वेढा दिला होता, म्हणून त्याचे पारिपत्याकरितां व्यंकटराव भावे नरगुंदकर यांनीं पेशव्यांपाशीं मदत मागितल्यावरून परशुरामभाऊ सैन्यासुद्धां दक्षिण सरहद्दीवर आले होते; त्यांनीं पत्राप्रमाणें बंदोबस्त केला; पण इतके होईतोंपर्यंत कुडलगीकर श्रीस्वामी हे रामतीर्थ पर्यंत आले होते व इकडून करविराहून ही श्रींची

स्वारी तेथें जाऊन पोंचली. मग उभयतांच्या भेटी होऊन समस्त ब्र-म्हवृंदाचे संमतीनें पुनः ककमरी येथें ठराव होऊन हद्दीबद्दल पूर्वी शाहूमहाराज व पेशवे यांजकडून मिळालेल्यापत्राप्रमाणेंच गुमास्ते, शास्ते, देशपांड्ये वगैरेंचे विद्यमानें समस्त ब्राह्मवृंदांच्या सह्यांनिशी शके १७०६ क्रोधननामसंवत्सरे फाल्गुन वद्य ९ चंद्र २२ रविलाखर रोजीं ठराव झाला. त्यावर पुष्कळ ब्राह्मवृंदांच्या सह्या आहेत. ह्या खेरीज ह्या कारकीर्दीत विशेष गोष्ट झालेली आढळत नाहीं. पुढें हे शके १७१५ कार्तिकशुद्ध १ रोजीं यज्ञेश्वर शास्त्री पुणेकर यांस अधिकार देऊन आपण शके १७१६ चैत्र वद्य १२ रोजीं समाधिस्थ झाले. यांची कारकीर्द १७ वर्षे होती.

यज्ञेश्वर शास्त्री पुणेकर (नरसिंह भारती) हे शके १७३० चैत्र शुद्ध ११ रोजीं वे. रा. सरस्वती भट्टजी लाटकर यांजकडे अधिकार सोपवून चैत्र शुद्ध द्वादशी रोजीं समाधिस्थ झाले. ह्या कारकीर्दीत जातीधर्मप्रकरणीं बरेच किरकोळ ठराव झाले. परशुराम भाऊ पटवर्धन यांनीं संकटसमयीं बालविधवेचा पुनर्विवाह करण्याची मोकळीक होण्याबद्दल प्रयत्न केला, परंतु ती गोष्ट शिष्ट संमत न झाल्यामुळें पुनर्विवाहाला परवानगी मिळाली नाहीं. यांची कारकीर्द १४ वर्षे होती.

त्यांचे मागून अधिकारापन्न झालेले शंकर भारती (सरस्वती भट्टजी लाटकर) शके १७३३ भाद्रपद वद्य ३० रोजीं मौजे रिवद्रापूर येथें रामशास्त्री वाडीकर (तैलंगस्वामी, द्राविड स्वामी, कर्की स्वामी) यांस अधिकार देऊन शके १७३३

माघ वद्य २ रोजीं समाधिस्त झाले. त्यांचे वेळीं कांहीं विशेष गोष्ट झाल्याचें आढळलें नाहीं.

हे तैलंग स्वामी पदारूढ झाल्यापासून पुढील हकीकत बहुतकरून सर्वांस माहीत आहे. हे स्वामी पूर्वाश्रमीं श्रीनृसिंहवाडी येथें राज्यप्राप्त्यर्थ दूर्वा रस प्राशनकरून बरेंच दिवस तपश्चर्या करीत होते. पुढें त्यास दृष्टांत झाला कीं, थोडेच दिवसांत तुमची इच्छा पूर्ण होईल. इकडे गादीवर असलेले स्वामीस दृष्टांत झाला कीं, तुम्हीं अधिकार देणे तो अमुक मनुष्यास द्यावा. त्यावरून श्रीवाडी येथून त्यास बोलावून आणून आश्रम देऊन सर्व अधिकार त्यांचे कडे सोंपविला; यांचे कारकीर्दींत संस्थानचा फार उत्कर्ष झाला.

यांची स्वारी पैठणाला गेली होती, तेव्हां पैठण मुक्कामीं समस्त ब्रह्मवृंद, देशमूख, देशपांड्ये वगैरे एकंदर शिष्य मंडळींनीं श्रीचे मठाकरितां रा. चिंतामण दोलगे ह्यांचा वाडा सावकारांनीं घेतला होता, तो श्रीकडे अर्पण करवून पत्र करून दिलें व तेथील खर्च चालण्यास गांव गन्ना पट्टीनें दरसाल २०० रुपये उत्पन्न देण्याबद्दल पत्रें करून दिलीं. तेव्हां सदर क्षेत्रीं मठ बांधिला तो तेथें अद्यापि आहे. हें वर्तमान शाके १७२६ भावनाम संवत्सर ज्येष्ठ शुद्ध १२ रोजीं घडलें.

क्षेत्र विमळ निर्मळ येथें गुरुस्वामीची समाधि आहे, म्हणून

(मा. टी.) ✽ कर्की असें कानडींत दूर्वेला नांव आहे. व हे स्वामी दूर्वा रस प्राशन करूनच अखेर पर्यंत होते म्हणून त्यासही तेंच नांव पडलें.

मागें लिहिलेंच आहे; त्या समाधि भोंवती चौसोपी होती, तिचा जीर्णोद्धार **जगन्नाथ गोविंदजी मेत्री** यास मक्ता देऊन पुष्कळ द्रव्य खर्चून करविला. त्याचें काम शके १७४५ पासून शके १७४९ पर्यंत चालेलें होतें. ह्यांत शिष्यवर्गाकडूनही बरीच मदत झाली होती. पुढें सदर जागेस ख्रिस्ती लोकांपासून उपद्रव होऊं लागला, तेव्हां तेथील लोकांनीं श्रीच्या संमत्तीनें कंपनी सरकाराकडे अर्ज करून बंदोबस्त करून घेतला. त्या अर्जावरून विमळनिर्मळ क्षेत्राची प्राचीन माहिती, ख्रिस्ती लोकांचें सौजन्य, त्या काळचें आमचें लोकांचें पाणी, व अर्थात् कंपनी सरकारचीही न्याय देण्याविषयीं तत्परता, इतक्या गोष्टी दिसून येतात, म्हणून तो अर्जच येथें अक्षरशः वाचकांकरितां उतरून घेतों.

" अजम मेहेबान **लेस्टक राबर्ट रीड साहेब** एस्क्वायर बहादूर प्रिन्सिपाल माजिस्त्रेट जिल्हा कोकण.

साहेबांचे हुजूरास. शुभ इच्छीत समस्त हिंदुजातीचे लोक खाली सह्या करणार सलाम आर्ज ऐसाजे या मुलखांत अजमासें १०० वर्षांचे सुमारें फिरंगी राज्य. हात न वळस फिरंगी याणीं मराठे लोक फार जुलूम करून बाटविलें* व बाटवावयाचें काम चालविलें होतें. ते समयीं बहुतेक प्रजेच्या संकट योगानें श्रीमंत राजश्री **आपा साहेब पेशवे** याणीं फिरंगी यांचा पराभव करून स्वराज्याचा अंमल चालविला हा लौकीक सर्वांस विदित आहे व खावंदासही

---

* यांचे जुलमाची सविस्तर हकीकत गोमांतकचे इतिहासांत वाचकांस सांपडेल. एकट्या " सात फ्रान्सिस्कशावियर" यानें एकंदर आपले हयातींत १२ लाख मनुष्यांस बाटविलें!! शिवाय बाकीचे पाऱ्यांनी! पु. कर्ता.

विदित असेल. त्याजवर मजरे विमळ तर्फ आगाशी येथें श्रीशंकराचार्य जगद्गुरु महाराष्ट्र धर्मस्थापक यांची समाधी आहे असें कोणीएक योगी येऊन त्याणें शंकराजी केशव सुभेदार सरकारचे मुखत्यार अधिकारी यांस दाखविलें; तें समयीं समाधीचा जीर्णोद्धार ( हा सन १७५० त झाल्याचें समजतें पु. क. ) करून मजरे मजकूर ही धर्मपुरी करून स्वामी संस्थानची यात्रा वगैरे उत्साहाची सरकारांतून नेमणुक करून देऊन नेहमी अन्नसत्र ठेविलें आणि त्या जाग्यांत जे राहतील त्यांस सरकार दस्त आंग देणें व जमीन देणें माफ दिल्हे आणि दरोबस्त जमीन धर्मपुरीकडे दिली. त्या जाग्यांत फिरंगी लोकांचें देऊळ होते याजमुळें महाराष्ट्र धर्मांत मोटी अडचण ध्यानांत आल्यावरून किरीस्ताव लोकांचा धर्म चालला पाहिजे, याजकरितां श्री विमळ तीर्थाचे पश्चिमेस देवळास बागायतांतील करत्ती जमीन देऊन तेथें देऊळ बांधिलें आणि महाराष्ट्रधर्मास किरिस्ताव धर्माच्या देवळाची नड न ठेवितां त्याचा बंदोबस्त ठेवून सरकारची जमीन त्या लोकांच्या देवळास देऊन त्यालोकांचाही धर्म चालू ठेविला. परंतु सदरहू क्षेत्रांतील जमीनीवर त्यांचा वारसा अजी ठेविला नाहीं त्यास अजमासें ९० वर्षें झाली. असें असतां हल्ली देऊळ आहे तें चांगलें सारे लोकांचा समावेश होतो व अडचण कांहीं एक नसतां आदावतीनेंच तें देऊळ असून हल्लीं त्या देवळांत पाद्री आहे त्याणें जुने जाग्यावर सरकारचा हुकूम न घेतां बांधावयाकरितां जागा नीट करण्याचें काम चालविलें आहे; दररोज अजमासें १०० मजूर रखपितो त्यांस कानूंत ६० वर्षें जी वहिवाट चालली ती चा-

त्याची अशी मजबुदी आहे आणि ही वहिवाट १० वर्षांची आहे व पा-द्री याणें देऊळ या जाग्यावर केलें असतां महाराष्ट्र धर्मास नड आ-हे. तेथें माणसें पुरण्याची वगैरे वहिवाट करील व सालगुदस्ता, क्षे-त्रापासून लांब देऊळ आहे तरी श्रीस्वामीची पालखी कार्तिक वद्य ८ चे रात्रीस सालाबादीप्रमाणें मिरवत तीर्थाभोंवतीली येत असतां तेथें पाद्रीनें वाटेनजीक, आदावत त्याच्या मनांत वागून, केळी पुरल्या होत्या त्यांवर हाडें बांधून ठेविलीं होतीं व किरिस्ताव लोक आळी-कडे यात्रे समयीं आदावत. बहुत प्रकारें करितात. हाच पाद्री याणें बाबा आतू तेलगांवकर यांजकडे मुलांस शिकला देशी आल्या हो-त्या सबब त्याणें दारीं गोमुत्राचें मडकें ठेविलें होतें, यास्तव त्या-जला मारहाण केली तो कज्जा चिंचणी मुक्कामी साहेबांनीं म-नास आणून पाद्री याची तक्सीर व गैरशिस्त वहिवाट नजरेस आ-ल्यावरून नस्ते दिली, तोच हा पाद्री हल्लीं श्रीजगद्गुरु संस्थान ध-र्म पुरींत किरस्ताव धर्माचें देऊळ बांधण्याकरितां इरादा करून काम जारीनें केलें आहे. अशी बहुतप्रकारें पाद्री मजकूर याची व-हिवाट हिंदुधर्माविषयीं आदावत करण्याची आहे व हल्लीं देवळा-चें काम चालविलें आहे, तेथें पाटील व ब्राह्मण यांनीं अनरेबल गव्हरनर साहेब यांची पारदी घालून मनाई केली कीं, तूं सरकार हुकु-माशिवाय काम चालवूं नये. तें समयीं मना करावयास जे गेले त्याच्या बराबर फार बेअदबी केली. तेव्हां सदरहू संस्थानाविशीं हिंदु मात्रास आगत्य आहे आणि पाद्री याणें बे अदबीनें भाषण करून

---

*: दुराग्र. एकदां पेशव्यांची दुराग्र मोडून घर बांधल्याबद्दल काय परिणाम झाला तो बहुश्रुत वाचकांस माहीत असेलच! पु. क.

काम चालविलें तें, बंद करण्यास हिंदु लोक शक्त नाहींत असें नाहीं; परंतु नामदार सरकारचा अंमल झाला ते समयीं जाहीरनामे प्रगट झाले, त्यांत कोणाचेही धर्मात खलेली पडणार नाहीं वगैरे हरएक प्रकारें सांभाळ होण्याविषयीं दिलदिलासें लिहिलें आहे, त्या प्रमाणें ईश्वरावर सरकारचा अंमल झाल्यापासून परस्पर जातींत कितीएक तऱ्हेचे आदावतीचे प्रकार आहेत परंतु सरकार इन्साफाचे ठिकाणीं स्वधर्मधर्म विचार होऊन त्याचे त्याचे योग्यतेनुरूप इन्साफांत मदत होऊन कोणाएकाचे धर्मास वगैरे विरुद्ध वहिवाट चालली नाहीं हें पाहून सरकारचें अभिष्ट चिंतन करीत असों. हल्लीं पाद्री याणें आमचे धर्माच्या जाग्यांत संकट निर्माण केलें, तें मामूल वहिवाटीप्रमाणें बंदोबस्त होऊन दूर होण्यास व सरकारचे कानूप्रमाणें मदत होण्यास कांहीं विलंब लागणार नाहीं असा पूर्ण भरवसा जाणून, बेआदबी करणारांबरोबर बेआदबीची वहिवाट न करितां फार माणसाचें बळानें काम जारी केलें आहे, त्यास जलदीनें मनाई होऊन बंदोबस्त झाला पाहिजे. म्हणजे सदरहू मजकूर श्रीजगद्गुरु संस्थान श्रीशृंगेरी करवीर व क्षेत्र काशी वगैरे मठांत निवेदन होऊन मे. आ. साहेबास विदित होऊन बंदोबस्त होईल परंतु त्यास दिवस गत लागेल आणि पाद्री यानें आमचे हिंदुधर्माचे जागीं भारी संकटाची वहिवाट चालविल्यामुळें त्याचा व

* केवळ तरवारीच्या जोराचेच गोडवे गाणाऱ्या राज्य कर्त्यांच्या जानागाईनीं वरील गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. पण प्रस्तुत आमच्या लोकांचेही आमचें पण गेल्या सारखें झाल्यामुळें त्यांस देखील विस्मरण होत चाललें आहे। "ईश्वरेच्छा बलीयसी" पु. कं.

आमचा मातबर बांधा बेदा झाला, तो मिळवणार खावंद मुखत्यार आहेत. आनरेबल कंपनी सरकारचे अंमलांत कोणतेही क्षेत्रीं धर्माविषयीं आदावत करणारांची वहिवाट कबूल केली नाहीं व बांधा ही पडला त्याची सुदामत वहिवाटीप्रमाणें चालविण्याविषयीं बंदोबस्त झाला. त्याप्रमाणें संस्थान मजकुरीं कंपनी सरकारचें राज्य आणि श्रीस्वामींचे इतमामाचा बंदोबस्त सरकार चालवीत आहे, असें असून हल्लीं पाद्री मजकूर सरकारचा हुकूम न घेतां दरम्यान आपल्या बळानें हिंदुधर्मास विरुद्ध वहिवाट करीत आहे ही बंद होई तें करणार साहेब आहेत. तारीख १० माहे सप्टेंबर सन १८३० हे अर्ज."

या अर्जावर तारीख १ अक्टोबर १८३० रोजीं अर्जदाराचें म्हणण्याप्रमाणें निकाल मिळून बंदोबस्त झाला. शके १७५२ याचे पूर्व वर्षी कुडलगी श्रीशंकर भारती हे मेजर जनरल सरजान मालकम साहेब यांजकडून रहदारी मिळवून विमळचे यात्रेला आले होते; असें परवान्यावरून दिसतें.

शके १७४९सालीस्वारी पुण्याला गेली होती, तेव्हां मामूलवहिवाटीप्रमाणें शहरांत पट्टीची याद केली. त्यावेळीं इंग्रजी होऊन नुकती १० वर्षेच झालीं होतीं; तेव्हां कलेक्टर साहेबांनीं जाहीरनामे फिरविले कीं, ही पट्टी सरकारी नव्हे ,पाहिजे तर द्यावी, पाहिजे तर न द्यावी वगैरे. त्यावरून वे. शा. नीलकंठ शास्त्री प्रभृति प्रमुख मंडळीनें अर्ज केला, नंतर कलेक्टर साहेबांनीं जाहीरनाम्याचें स्पष्टीकरण करून खुषीप्रमाणे धर्माची पट्टी दिल्यास सरकार नाखूष नाहीं असें कळविलें.

मोंगलाई इलाख्यांतील सुरपूरचे राजे कृष्णाराय

यांजपासून कोळूर, गडेसुडूर व लिंगनहळ्ळी हे गांव इनाम मिळाले; पैकीं लिंगनहळ्ळी हा गांव संस्थानाकडून तमण शास्त्री यांस दिला. तसेंच मोंगलाकडून कंडारी हा गांव मिळाला ह्यावेळीं पांच महिने पर्यंत स्वारीचा मुक्काम भागानगरांत होता. कांहीं कारणावरून हा गांव बदलून तांबूळवाडी म्हणून दुसरा गांव दिला होता; पण इंग्रज सरकारकडे निजामाकडून जो मुलूख गेला, त्यांत हा गांव सांपडल्यामुळें जप्त झाला; त्याबद्दल काम चालूं आहे.

शके १७५३ मध्यें मौजे ओवळीये हा गांव राजे खेम सावंत यांजकडून श्रीचे रथोत्साहाबद्दल इनाम मिळाला. त्याचप्रमाणें शके १७५४ सालीं मौजे मंटूर हा गांव श्रीबाबासाहेब महाराज यांजकडून शके १७५६ सालीं मौजे वाळकी कसबे लाद हा गांव

* (मा. टी.) मागें लिहिल्याप्रमाणें विजयनगरचें राज्य मोडल्यावर त्या राज्याच्या आश्रयास जे पाळेगार वगैरे नाईक होते त्यांनीं सोंदी, इक्करी, बल्लारी, चन्नापट्टण, गेरसपा (येथीलच धबधबा प्रसिद्ध आहे तो.) वगैरे ठिकाणीं स्वतंत्र संस्थानाच्या स्थापना केल्या. तेव्हां सुरपूर हेंही एका "बेड" जातीच्या नायकानें स्थापिलें. पुढें बरीच संस्थानें टिपूच्या राज्यांत सामील झालीं पण हें मराठ्यांच्या आश्रयानें होतें. नंतर इंग्रजींत सन १८५७ पर्यंत त्यास कांहीं धोका आला नाहीं; पण सत्तावन सालीं बाबासाहेब नरगुंदकर व भिमराव मुंडरगी ह्यांजबरोबर इंग्रज सरकारचे विरुद्ध फितूर केल्याचा आरोप आल्यावरून इंग्रज सरकारची फौज लिंगसुराहून सुरपुरावर (यास पूर्वी वाकणकेरी असें नांव होतें) आली व नायकास धरिलें तेव्हां त्यानें आत्महत्या करून देह ठेविला.

संताजी घोरपडे सेनापति यांनीं श्रीकडे दिला.

शिवाय गांवगन्ना पुष्कळ इनाम या कारकीर्दीत मिळाले. स्वराज्याचा लय झाल्यामुळें यापुढें दुसरी अशी कारकीर्द झाली नाहीं. या वेळचे सर्व राजे व संस्थानीकयांचे संस्थानाकडे पूर्ण लक्ष्य असून ते अगदीं श्रीचे आज्ञांकित असत. संकेश्वरचे नदीला जो घाट आहे तो निपाणकर अप्पा साहेब (यांचा दरारा किती होता हें प्रसिद्धच आहे) यानीं गुन्हेगारीस्तव* बांधून दिला; सांगलीकरांनी यज्ञमंडप व देवळासभोंवतालची फरसबंदी ही बांधून दिली; चिंतामण राव अप्पासाहेबांचा तर गुरुचरणीं अत्यंत विश्वास असे व अद्यापि पटवर्धन घराण्यामध्यें तसेंच चाललें आहे. मौजे सुतकट्टे, कटनभावी, वोडक्यानहट्टी हे गांव सांगलीकरांकडून मिळाले,** व मौजे दवनकट्टे हा गांव कुरुंदवाडकराकडून मिळाला. कुरगोड गांव पूर्वीच चव्हाणां-

* एकदां (शके १७३८) अखेर असे झालें कीं निपाणकरांचा मुक्काम संकेश्वरास पडला असतां त्यांचे लष्करी लोकांनीं गांवांत येऊन दांडगाई केली; त्या गर्दीत पेठेंतील कांहीं दुकानें लुटलीं गेलीं. हें वर्तमान श्रीस समजल्यावर राग आला व निपाणकर यांस दर्शन न देतां निरोप झाला. पुढें ही गोष्ट श्रीमंत बाजीराव पेशवे यांस पंढरपुरीं कळली, तेव्हां श्रीस चातुर्मास्यास पुण्यास नेऊन निपाणकरावर कृपा करण्याविषयीं विनंति केली. इतक्यांतच शनवार वाड्यावर तांबडा बावटा लागून पेशवे गंगातिरीं गेले, तेव्हां ती गोष्ट तशीच राहिली. उपरांत ४।५ वर्षांनीं निपाणकर हे दर्शनास आले व निपनाळ व गावनाळ हे दोन गांव दिले व नदीला घाट बांधून दिला. पैकीं गांव गेलेच. घाट मात्र जातां

कडून मिळाला होता. पुढें त्या प्रांताचे स्वामील जमरिंडीक-राकडे आल्यावरून त्यांनींही त्याबद्दल सनद करून दिली. ह्या कारकीर्दीत संस्थानीं शिल्लक मुबलक होती; राजे संस्थानिक वगैरे शेंकडों लोकांनिशीं दर्शनाला यात्रेला वगैरे येत असत व महिना महिना राहत, तथापि त्यास कोणत्याही गोष्टीची वाण पडत नसे. हणमंत रावजी व त्यांचे चिरंजीव गोविंद राव हणमंत टोणपे (यानांच बाबा दिवाण असें म्हणत) हे या वेळीं दिवाणगिरीचें काम पहात असत. शिवराम भट्ट म्हणून कुरुंद-वाडचे जोशी होते, त्यांचा व श्रीस्वामींचा वाडी मध्यें असतां परिच-य पडला होता, त्यानांही संस्थानीं आणिल्यावरून वकिली व केव्हां केव्हां कारभार हीं कामें ते पहात असत. हे चांगले मुत्स-द्दी होते म्हणून संस्थानांतून त्यांना हुद्देदार (हुदार) हा किता-ब मिळाला होता. राघु हुजरे म्हणून एक हुजऱ्या होता त्यानें कारभारांत कांहीं दिवस बखेडा केला होता पण पुढें त्यास ध-रून हतनुराकडे नेवून ठेविलें व त्याची जिंदगी जप्त केली, तेव्हां सर्व सुरळीत चाललें.

या कारकीर्दीत सर्व प्रकारचे उत्तम गुणी लोक, उत्तम जना-वरें, उत्तम वस्तु संस्थानीं होत्या. द्वारकामठाची व्यवस्थाही यामब-कडे होती असें तेव्हांच्या झालेल्या पत्रव्यवहारावरून दिसतें.

---

(मा-टी.) ※ जातो असून राहिला आहे.

---

(मा-टी.) ✱ प्रस्तुत पहिले दोन अष्टेकरांकडे व तिसरा मोळगेकर बाप-ट यांजकडे संस्थानाकडून आहे.

करवीर मठ दग्ध झाला होता, त्याची चांगली दुरुस्ती याच अंमलांत झाली. रंकाळ्यांतून पाण्याचा नळ आणून मठामध्यें पाणी मुबलक करून सोडिलें. पेशवाई बुडाल्यानंतर एल्फिन्स्टन साहेब इकडे प्रांताची व्यवस्था पहाण्याकरितां आले होते, तेव्हां आणखी कांहीं गांव देऊन हें संस्थान एक लक्षाचें करावें असें त्यांचे मनांत होतें पण ती गोष्ट स्वामीजीं नाकारिली "पुनः बाजीराव राज्यावर आल्यावर त्याजपासून आपण गांव घेऊं; म्लेंछाची देणगी आपण घेत नाहीं असें स्वामीनीं सांगितलें" असें म्हणतात. पुष्कळ लोकांच्या ठेवी संस्थानांत असत; शेतकरी, व्यापारी वगैरे लोकांना उसने किंवा हलक्या व्याजानें पैसे देऊन मदत होत असे. स्वतः स्वामी दूर्वांचा रस घेऊन असत, तरी पंक्तीचा बेत चांगला असे. कित्येक जातीनिर्णयाबद्दल, सतीजाण्याबद्दल वगैरे सार्वजनिक ठराव या कारकीर्दीत बरेच झाले. याप्रमाणें २५ वर्षे अधिकार चालवून शके १७५९ चैत्र शुद्ध ८ रोजीं भैरव दीक्षित कऱ्हाडकर यानां अधिकारावर स्थापून दुसरे दिवशीं आपण समाधिस्थ झाले. या वेळीं तिजोरींत सुमारें लाख रुपये शिल्लक होती. परिणामाचे वेळीं शिक्का मोर्तबसुद्धां सर्व श्रीमंत चिंतामण राव अप्पा साहेब यांच्या स्वाधीन करून संस्थानची सर्वप्रकारें व्यवस्था नीट ठेवण्याविषयीं लिहून श्रींनीं परलोकीं प्रयाण केलें. यानां आठवून अद्यापि लोक हळहळतात; तर त्यावेळीं किती वाईट वाटलें असेल याचे अनुमान वाचकांनींच करावें! अस्तु. हे स्वामी न्याय व मिमांसा यांत अग्रेसर होते.

भैरव दीक्षित (शंकर भारती) यानां आश्रम झाला

त्याच साली म्हणजे शके १७५१ त मौजे कळवीकट्टे हा गांव श्री शाहू छत्रपति यांजकडून ब्रम्ह संतर्पणास मिळाला व मोंगलाईतील कुंजरी गांवाची अदलाबदलही दिवाण चंदुलाल यांजकडून त्याच वेळीं झाली.

इकडे शृंगेरीकर श्रीस्वामी हे महायात्रेस म्हणून निघून या प्रांतीं येण्यास निघाले व सदर मजकूर वे॰ सुब्बाशास्त्री व कालभट्ट शास्त्री यास या संस्थानी पाठवून कळविला; व उभय संस्थानांत भिन्नभाव नाहीं तेव्हां जाण्यास हरकत असूं नये वगैरे मजकुराचें पत्रही लिहिलें. त्यावरून इकडूनही शिवरामभट्ट लाटकर व गोविंदराव बाबा दिवाण यांजकडून शके १७६३ प्लवनामसंवत्सर मार्गशीर्ष शुद्ध १ इंदुवारीं पत्र सामोपचाराचें पाठविलें. पण पुढें श्रीशृंगेरीकर स्वामीचा यात्रेचा उद्देश नसून संचार करून घालमेल करण्याचा कपटोपक्रम दिसला. तेव्हां कुडलगी संस्थानचे सुभेदार शंकर शास्त्री यांणीं शके १७६४ शुभकृतुनामसंवत्सर भाद्रपद कृष्ण १० गुरुवार रोजीं धारवाडाहून इकडे सदरील लाटकर यास पत्र लिहिलें कीं, “शृंगेरींत असणार स्वामी यांणीं स्थळांतच श्री शारदा देवीची पूजा करून घेऊन तेथील सरंजाम अनुभव करून इतर हल्यास न करितां राहवें, म्हणून पूर्व निबंधन आहे, तें जगत्प्रसिद्ध आहे. हल्लीं तेथें असणार स्वामी यांणीं महायात्रार्थ जावें म्हणून निमित्त करून देश संचार वगैरे व्यवस्था करण्याचा हेतु धरून देशावर असणार सर्वत्र शिष्य मंडळीचें नांवें पत्र लिहिलें होतें. त्या पत्राची नक्कल तुम्हांकडे रा॰चे विधंमानें आणखी कांहीं हुकुमाच्या नकला सुद्धां पाठविलें आहे. त्या-

नास आणून तुमचे प्रांतास श्रीशारदा देवीची पूजा करणार स्वामी आले असतां कोणते विषयीं त्यांस आस्पद होऊं नये. पांचशे वर्षांपासून आहे तें संप्रदाय सोडून गैर चाल करणेस उद्योग चालवितात. हा मजकूर कोणतेही तुम्हांस समजले नाहीं वरून-त्यांस पत्र दिल्हें साररवे दिसतो. पुढें त्याप्रमाणें होऊं नये यांचा बंदोबस्त केला पाहिजे. ममतापूर्वक वारंवार क्षेम कुशलाचीं पत्रें पाठवून मन संतोषवीत आलें पाहिजे. इ०" हें पत्र आल्यावरून इकडून वें० रा० **गणेशभट बागेवाडीकर** सरमठाधिकारी यांस धारवाडास कागदपत्रासमवेत कुडलगी मुरवत्यार यांजकडे पाठविलें; तेव्हां सरकारांत काम चालून आनरेबल् **डिवारक साहेब सुपरिन्टेन्डेन्ट नगर** यांजकडून चंद्र ६ जुलई सन १८४२ रोजीं **शिवमुगी** मुक्कामी नंबर ३६१ चा निकाल झाला तोः– " सांप्रत तुम्हीं लेरवन केलें जे जून २३।२४ जुलई १ या ताररवेंत लेरवन केलें तें जुमला ३ अर्जी अभिप्राय जाहीर झाला. **शृंगेरी स्वामी** यांनीं महायात्रेस जावें म्हणून निमित्त करून देशावर संचार करावा म्हणण्याचे इरादेंत आहेत म्हणून लिहिलें होतें. येथून महायात्रेस जावें तर पहिलें नाशिकास जाणेस बरोबर मार्ग कोणते कीं, त्या मार्गानें जावें; नाहून देशावर संचार करण्यास कारण नाहीं म्हणून श्रीस्वामी यासी श्रुत करणें विषयीं शृंगेरी मठाचे सर्वाधिकारी पुटराव पारपत्यगार **व्यंकटाचल शास्त्री** यांस देरवील आलाहिदा हुकूम केला आहे. त्याप्रमाणें जातील. शिवाय देशसंचार करणार नाहीं. तुमचे मनचे देशावर शृंगेरी स्वामी यानीं येण्याचें मामू-

ळ कधींच नाहीं. गैरमामूल करणार आहेत म्हणून आणि शिव सुगीस आले दिवशीं हत्तीचे अंबारीवर पंचकळस घालून घेऊन गैरमामूल करून आले म्हणून देखील लिहिलें होतें. तुमचे मठचे देश म्हणून तुम्ही सांगणे पेकीं आमचे डिव्हीजन व्होनोळी, हरिहर वगैरे कितीएक ताळुके आहेत. त्यांत व्होनोळी हरिहर मार्गानें श्रीशृंगेरी स्वामी याणीं महायात्रार्थ जातात म्हणून वगैरे कमिशनर हुजुराहून सादर झालें तें रुदारींत नमूद आहे, त्या करितां यामार्गानें त्यांणीं जाणे विषयीं हरकत करणेस होत नाहीं. त्यांणीं जातां येता सहित किंमपि गैर मामूल करूं नये म्हणून त्या मठचे सर्वाधिकारी वगैरेचे नांवें आलाहिदा हुकूम केला आहे, त्यांजवरून त्यांनीं लेशमात्र गैर मामूल चालणार नाहींत. इ." याचप्रमाणें दुसरा तारीख ११ जुलईचा ठराव व मुंबई सरकारचे सेक्रेटरी यांचे नंबर २३१५ तारीख ९ आगस्टचें पत्र आलें. हें काम कुडलगीकर श्रीस्वामी यांचे मुखत्यार यांजकडून सरकारांत चाललें होतें. सबब तिकडचे हद्दींत बंदोबस्त झाल्यामुळें इकडचे मठाचे हद्दींच्या आयतांच बंदोबस्त झाला सबब सरकारांत जावें लागलें नाहीं. खेरीज पटवर्धन इलाख्यांतून बंदोबस्ताचीं पत्रें गेलींच होतीं.

याचप्रमाणें शके १७६३ सालीं तीर्थहळ्ळीकर स्वामी पुण्यास आले होते तेव्हांही याचप्रमाणें ठराव झाल्यानें कळतें.

या कारकीर्दींत इंग्रज सरकाराकडून संस्थानांत घालमेल करण्याचा थाट दिसला तेव्हां जाबजबाब वगैरे देऊन स्थिर स्थावर करण्यास खर्च फार झाला ( तरी अव्वलदर्जातले नांवक-

मी झालें ) शिवाय हे स्वामीही चैनी होते. यामुळें शिल्लक सर्व संपून कर्ज झालें त्याबद्दल मागें लिहिलेलें सुतकट्टे वगैरे गांव सावकारांकडे गेले. व नातूंचें कर्ज सुमारें ८५००० झालें, त्याबद्दल दरसाल अजमासें पंचेचाळीसशें रुपये अद्याप नातूंना पेन्वत असतात.

याप्रमाणें या शंकर भारतीची कारकीर्द १ वर्ष होऊन शके १७६८ वैशाख वद्य १२ रोजीं अप्पा दिक्षित कऱ्हाडकर यानां अधिकार देऊन त्यांनीं दुसरे दिवशीं देह ठेविला. हे श्रोतामध्यें धुरीण होते.

या ( अप्पा दीक्षित ) नरसिंह भारतीचे कारकीर्दींत कांहीं जमिनी मिळाल्या, परंतु इनाम कमेटीच्या चौकशींत कांहीं गांव तहा हयांत ठरलें, कांहीं बेहड्यांत रूर्च नाहींत वगैरे सबबी वरून जप्त झाले. ( यांची नांव निशी पुरवणींत आहे. ) सावकाराचीही फार ओढ झाली. शिवरामभट लाटकर व बाबा दिवाण यांच्यामध्यें बेबनाव झाल्यामुळें श्रीनीं उभयतांकडून एकचित्तानें राहून कारभार पहावा अशाबद्दल ज्येष्ठ शुद्ध १२ शके १७६८ रोजीं ५ कलमी ठराव करून घेतला व असेच अपसांतील कित्येक दुसरे तंटे मोडून सर्वांचें लक्ष्य संस्थानाकडे लागेलसें केलें.

कोणी एक धोंडभट सुरत्राण म्हणून ब्राम्हण होता तो सर्व राजचिन्हें आपण घेऊन, मी शृंगेरी मठाचा हस्तक म्हणून सांगून प्रांतांत जातीधर्म पहात फिरूं लागला. तेव्हां सरकारांत काम चालल्यावरून नासिकचे कलेक्टर मि॰ सर राबर्ट

कीय यांणीं पंचनामा करून सदर धोंडभट हा तोतया आहे असें शके १७७० साली ठरवून त्याची सर्व चिन्हें घेतली.

आबा दिवाण यांचे प्रतिपक्षी बखेडेखोर लोकांनी **रामचंद्रपंत** वगैरे नांवें लिहून नानाप्रकारच्या अर्ज्या आपसांतील द्वेषामुळें संस्थानचे विरुद्ध सरकारांत केल्या; त्यावरून गवगवा होऊन संस्थानांतून प्रतिकारकीर्दीस एकसाली नजराणा घेण्याचें ठरलें. व त्याप्रमाणें बेळगांवचे कलेक्टर यांजकडून तारीख २ माहे मे सन १८४८ इ० (शके १७७०) रोजीं लिहून आलें. तो नजराणा अद्यापि त्याप्रमाणें द्यावा लागत आहे. व प्रस्तुत कारकीर्दीही लोकर बदलतात यामुळें संस्थानाला फार पेंच आहे. या नजराण्याबद्दल गुरुस्वामीच्या अखेर पर्यंत (शके १८०६ अखेर) एकंदर ७४७१८०॥१८ इंग्रज सरकारांत भरणा झाला आहे. कोल्हापूर सरकारांतूनही पेषकषा, मेजवानी वगैरेबद्दल घेण्या विषईं काम चाललें व त्याबद्दल निकाल जाहला तो पुढें लिहिला आहे.

वर लिहिल्याप्रमाणें त्यावेळीं संस्थानाला चोहोंकडून पैशाचे पेंच आले, यामुळें द्रव्याची अगदीं टंचाई झाली. तथापि त्यास्वामींनी पुष्कळ कष्ट सोसून बरीच स्थीरस्थावर केली. पुष्कळ सावकारांच्या अपसांत तोडी केल्या व पुढेंही पुष्कळ व्यवस्था करण्याचें यांचे मनांत होतें, पण इतक्यांत निरयाणाचा प्रसंग ठेपला. हे जाणून भाद्रपद शुद्ध ७ शके १७८२ रोजीं वे. रा. **गंगाधर भट जोशी भिलवडीकर** यांस आश्रम देऊन हे स्वामी (**अप्पा दीक्षित**) दुसरे दिवशीं समाधिस्थ झालें. याप्रमाणें ही

कारकीर्द एकंदर १४ वर्षे झाली. हे स्वभावानें मन मिळावू असून गरीबांचे कनवाळू असत. हे मुळचे उत्तम वैदीक होते.

या नव्या (**गंगाधर भटजींच्या**) कारकीर्दीपासून आजपर्यंत भिलवडीचेच पुरुष गादीवर बसत आले आहेत. **मुधोजी नाईक निंबाळकर** यांजकडून शके १७८५ साली व श्रीमंत **चिमणाजी रघुनाथ सचीव** यांजकडून शके १७८३ साली "या उत्तर प्रांती आचार व्यवहारादि सर्व अधिकार पहाणें हा अधिकार करवीर मठाचाच आहे." अशा मजकुराची पत्रें आली आहेत. त्या कारकीर्दीत कांहीं कर्जाची फेड झाली, या खेरीज विशेष गोष्ट नाहीं. यांनीं **रघुनाथ भट जोशी भिलवडीकर** यास शके १७८९ ज्येष्ठ वद्य ११ रोजीं आश्रम देऊन हे त्याच दिवशीं नारायण स्वरूप झाले. यांणीं ६ वर्षे अधिकाराचें काम पाहिलें.

या **नरसिंह भारतीचे** (**रघुनाथ भट**) वेळीं ब्राह्मण विधवांच्या पुनर्विवाहाबद्दल चोहोंकडे नवीन मंडळींत चळवळ होऊन अखेर पुणें मुक्कामी मोठी सभा भरून श्रीसमक्ष वादविवाद झाला. त्यांत विधिपक्षाकडे वे० **विष्णु शास्त्री पंडित** व निषेध पक्षाकडे वे. शा. **नारायणाचार्य गजेंद्रगडकर** हे प्रमुख होते. या वादाबद्दलची सविस्तर पुस्तकें छापून प्रसिद्ध झालींच आहेत. सबब येथें विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. वादाचे शेवटीं कलियुगामध्यें सदर पुनर्विवाहा शास्त्र संमत नाहीं असे बहुमतानें ठरलेंवरून त्याप्रमाणें निर्णय पत्र शके १७९२ चैत्र वद्य २ रोजीं संस्थान-

चे शिक्क्यानिशीं जगद्धितेच्छु छापखान्यांत छापून चोहोंकडे प्रसिद्ध झालें. त्याकृत्यांत संस्थानाला एकंदर १६३४५ रुपये खर्च झाला. पैकीं पूजा द्रव्य वगैरे ७०५० रुपये मिळाले व बाकीं ७२९५ रुपये सर्व जाहागीरदार शिष्यवर्गाकडून वर्गणीनें मिळाले व बाकीं संस्थानचे खर्च झाले.

रा. **गणेश शास्त्री गोळवलकर** हे होळकर सरकार मार्फत कांहीं सरकारी कामानिमित्त इंग्रजाचे विलायतेस जाऊन आले, म्हणून त्यांस ज्ञातीधर्म संबंधीं काम चालू होऊन त्याबद्दल विचार होण्याकरितां श्रीमंत होळकर सरकारचे विनंति पत्रांसोबत ते संस्थानीं आले. तेव्हां चोहोंकडून विद्वत्समुहाच्या " **समुद्रे नावा गयंतं स्वधर्मापरित्याग पूर्वकं गताऽगतेन ब्राम्हणेन सह निष्कृत्युत्तरं यथापूर्वं संव्यवहरणं शास्त्रानुकूलमिति** " अशा संमती आल्यावरून श्रावण शुद्ध ११ शके १७९४ अंगिरानामसंवत्सर रोजीं त्याप्रमाणें ठराव करून सदर शास्त्री यांस पुनः संस्कार करून ज्ञातींत घेतलें.

हे स्वामी मोठे तपोनिष्ठ व भाविक होते. यांनीं शंकेश्वर येथें एक पंचलिंगाचें देवालय बांधिलें, नवा रथ केला, यज्ञमंडपाची दुरुस्ती करविली व वेदशाळा सुरू केली. यानीं कार्तीक वद्य २ शके १७९५ रोजीं **हनुमंत भट जोशी** यांस अधिकार दिला व हे दुसरे दिवशीं ब्रह्मरूप झाले. हे सहा वर्षें अधिकारावर होते.

या **शंकरभारतीचे** वेळीं पूर्वी जे नजराण्याबद्दल करवीर दरबारांत काम चाललें होतें, त्याचा निकाल होऊन प्रत्येक

कारकीर्दीचे वेळीं करवीर सरकारांत ५००० रुपये द्यावे व तिकडून १००० रुपये पोशाखाबद्दल घ्यावे असें ठरलें. व त्यावरून मागील कारकीर्दीबद्दल १२००० रुपये घेऊन बाकीचे आमानत जमेपैकीं शिल्लक असलेले परत दिले. या खेरीज विशेष महत्वाची गोष्ट झाली नाहीं. ही कारकीर्दही लहानच फक्त तीन वर्षांची झाली. यांनीं शके १७९९ भाद्रपद वद्य १ रोजीं वे० **त्र्यंबक शास्त्री रामदासी** यास आश्रम देऊन त्याच दिवशीं देह ठेविला.

हे (त्र्यंबक शास्त्री) **नरसिंह भारती** अधिकारावर असतां, संकेश्वरामध्यें पुष्कळ तंटे उत्पन्न होऊन वित्तानें व अब्रूनें पुष्कळ लोक खराब झाले. **गोंडवाड** म्हणून एक संस्थानचा गांव होता तो १६००० रुपयांस विकला. किरकोळ सावकारानें जें काय कर्ज होतें तें वारलें. नातूचें मात्र देणें राहिलें आहे. संकेश्वर येथील अन्नखर्च, उत्साह खर्च वगैरेबद्दल माफ करून दिला होता. चातुर्मास्याला प्रायः संकेश्वरीं न राहतां रविंद्रापूर वगैरे अन्य ठिकाणीं राहण्याची वहिवाट पडली. करवीर मठाची दुरुस्ती करविली व भिलवडी येथें एक रामाचें देऊळ बांधण्यास सुरुवात केली तें काम अद्यापि चाललेंच आहे. यांनीं चैत्र शुद्ध २ शके १८०७ रोजीं वे० **वासुदेवशास्त्री** भिलवडीकर यांस मौजे **हिटणी** येथें आश्रम देऊन त्याच दिवशीं रात्रीं समाधी घेतली. ही कारकीर्द ७ वर्षें होती.

प्रस्तुत हेच (वासुदेव शास्त्री) **शंकर भारती** अधिकारापन्न आहेत. दोन वर्षांपूर्वी संकेश्वरचे नदीला **बेनवाडु**

येथें धरण बांधण्याचा सरकारांतून विचार चालला होता तो कायम झाला असता तर बरेंच गांव संकेश्वरचा मठ देवालय वगैरे बुडून जाण्याचा संभव होता पण मुंबई सरकारापर्यंत संस्थानांतून काम चालून अखेर धर्माचे बाबतींत नुकसान होत आहे, तर या कामांत हात घालूं नये; असा ठराव होऊन सरकारानें तो बेत रहित केला.

कोल्हापूर दरबारांत या संस्थानचें नांव अवल दर्जांत विशिष्ट म्हणून आहे, त्याप्रमाणें इंग्रज सरकारांत ही व्हावें म्हणूनच नजराणाही प्राचीन वहिवाटीप्रमाणें माफ व्हावा, किंवा निदान करवीर दरबाराप्रमाणें तरी कांहीं नियमीत असावा अशाबद्दलही काम चालू आहे असें समजतें. संस्थानची व्यवस्था सरळ रीतीनें चांगल्या प्रकारें चालावी, वेदशास्त्रादि प्राचीन

* या प्रकरणांत असे मुद्दे आहेत:—नामदार कोर्ट आफ् डायरेक्टर्स यांचे नंबर २६ तारीख २० आक्टोबर सन १८४७ चे पत्राच्या ११ व्या कलमांत असा मतलब आहेकीं " आमचे सरकार तुमच्या या धर्म संबंधी गादीस एकादी नेमणूक कायम करून देणे किंवा दिलेली रद्द करणें यांत हात घालणार नाही. या गादीस जाहागीर जमिनी दिलेल्या आहेत. त्याजबद्दल या गादीवर नवीन बसणारापासून जो नजराणा कोल्हापूर सरकारानें बसविला असेल तो आमचे सरकार घेतील. कारण त्यांपैकीं कांहीं खेडीं त्यांचे जुने मुलखापैकीं आहेत" इत्यादि.

नामदार मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन साहेब गव्हरनर इन्कोन्सिल इलाखा मुंबई आणि चापलीन साहेब बहादूर कमिशनर यांणीं

विद्यास उत्तेजन मिळावें, असा श्रीचा पूर्ण मानस आहे व त्याप्रमाणें उपक्रमही आहे. अशा प्रकारच्या सत्कृत्यांत उत्तरोत्तर शंकर कृपेनें यश यावें व संस्थानाकडून धर्म संरक्षण व्हावें हें भूषणास्पद आहे. असो;

(मा. टी.) ज्या जहागीरदारांच्या मालमत्ता नजराणा घेण्यास पात्र आहेत. अशा जहागीरदारांची व बडे लोकांची जेव्हां यादी केली, तेव्हां यासंस्थानचे अधिकारी यांचें नांव त्या यादींत नमूद केलें नाहीं. कारण ही जाहागीर धर्म संबंधीं देहनगी आहे व अशा प्रकारची देहनगी नजराण्यास पात्र नाहीं या गोष्टी संबंधीं सरकारी कागदपत्र आहेत.

अशा प्रकारच्या दिलेल्या स्थावर मालाच्या देहनगीवर सन१८६३ चा मुंबई सरकारचा आक्ट नं० २ क० ८ र० ३ अन्वये नजराणा घेऊं नये असा नियम आहे.

मे० पो० एजंट साहेब बहादूर प्रांत कोल्हापूर व कर्नाटक यांनी तारीख ३ फेब्रुवारी सन १८७५ इसवीचें थैली पत्र सदर समाधिस्थ श्रीगुरु **विद्या शंकर भारती** यांस पाठविल्यांत करवीर इलाख्यांतील एकंदर तेवीस हजार तीनशें शेचाळीस रुपये अकरा आणे सात पैसे उत्पन्नास नजराणा न घेतां पेषकशाबद्दल संस्थानाकडून ५००० रुपये घेऊन त्यांतून एक हजार संस्थानी द्यावें असें मुंबई सरकारचा ठराव नंबर ७३७८ तारीख ८ माहे दिसंबर सन १८७४च्या हुकुमानें ठरविल्याचें लिहिलें आहे.

याप्रमाणेंमुद्याबरआज दोन तीन कारकीर्दी काम चाललें आहे पण त्याचें यश घेणारा कोणी भगीरथ अद्यापि झाला नाहीं. शंकर कृपेनें अधुनिक राज विद्या विभूषितांपैकीं एखादा "कायदे पंडित" पुढें

पाप्रमाणें ही परंपरा आली. प्रस्तुतचे आचार्यहेमूळ भगवत्पूज्य पादाचार्यांपासून त्रेपन्नावें होत. हें मागें लिहिल्या परंपरेवरून वाचकांचे लक्षांत आलेंच असेल. वयस्क मनुष्य पाहून अधिकारी करण्याचा संप्रदाय आहे, व उत्तरोत्तर आयुर्मर्यादा ही अल्प होत चालली यामुळें कारकीर्दी लौकरच बदलतात. गृहस्थाश्रमी पाहून त्यांनाच उपदेश करण्याची जी चाल या मठांत आहे ती शास्त्र दृष्ट्या किंवा युक्तीला गैर आहे असें नाहीं; दोहोंला अनुसरूनच दिसते. कांकीं आश्रम धर्माचे क्रमानें पालन व्हावें, अशा विषयींच प्रायः श्रुतिस्मृतींची प्रवृत्ती दिसते.* त्याप्रमाणें ब्रम्हचर्यानंतर गार्हस्थ्याचा स्वीकार करून मग सन्यस्त व्हावें, हें विहीत होय. व सन्यास धर्माचरण परम कठीण यास्तव अंतःकरणाला जगांतील सुखदुःखाचा पुष्कळ संस्कार झाल्यानें ते प्रवृत्ति मार्गांतून निवृत्त होण्यास पुष्कळ अंशी योग्य हो-

(मा. टी.) होऊन या कामांत यश येईल तर ऐहिक आमुष्मिक कल्याणाची गोष्ट आहे।

---

* "जायमानो वै ब्राम्हणस्त्रिभिऋणवान् जायते॥ ब्रम्हचर्येण ऋषिभ्यो यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्य एषक अनृण इति" तैत्तिरीयश्रुतिः "ऋणत्रय मपाकृत्य मनोमोक्षे निवेशयत्॥ अनपाकृत्य मोक्षंतु सेवमानोव्रजत्यधः॥ वि. स्मृ.॥ "प्रथमायुषो भाग मुषित्वा स्वगुरोर्गृहे॥ द्वितीयमायुषोभागं कृतदारो वसेद्गृहे॥ वनेषुच विहृत्यैवं तृतीयं भागमायुष॥ चतुर्थ मायुषो भागं त्यक्त्वा संगान्परिव्रजेत्॥" मनुः॥ "ऋणं देवस्य यागेन ऋषींणां दान कर्मणा॥ संतत्या पितृलोकानां शोधयित्वा परिव्रजेत्" ॥ आश्रमादाश्रमं गच्छेत् इत्यादि.

तें, अतएव अशा स्थितींत सन्यस्त झाले असतां सहसा धर्मोल्लंघन होण्याची भीती नसते. तसेंच मूळ आचार्य स्थापीत विश्वरूपाचार्य हेही गृहस्थाश्रमीच होते तेव्हां तशा दृष्टीनें पाहिलें तरी गुरुपरंपरा प्राप्त मार्गानेंच अवलंबन करणें विहित दिसतें. व आचार्यांनींही कोठें भिन्न रीतीनें आज्ञा केली आहेसें वाटत नाहीं. आतां व्यवहार दृष्ट्या पाहिलें तर मात्र कारकीर्दी लवकर बदलल्यानें एक तर नजराण्याच्या खर्चाखालीं संस्थान जेरीस येतें. शिवाय अनुभव थोडा असल्यामुळें प्रसंग विशेषीं प्रमाद घडण्याचा संभव असतो. तसेंच संस्थानच्या कामाकाजासंबंधीं कांहीं नियम ठरलेले नसल्यामुळें प्रायः मर्जीप्रमाणें सर्व कामें चालतात. अर्थात् प्रत्येक कारकीर्दीत लोक नवे जुने होतात, यामुळें संस्थान संबंधीं खरी कळकळ कोणालाच राहत नाहीं व व्यवस्थेशीर काम होत नाहीं. याकरितां कांहीं तरी नियम सर्वानुमतें ठरवून त्यांचे अनुरोधानें संस्थानचें काम चाललें असतां संस्थानचा फार उत्कर्ष होणार आहे. आतां व्यक्तिविशेषामध्यें जसे गुण तसें दोषही असण्याचा संभव आहे. आणि प्रस्तुत राजसत्ता परकीयांचे हातीं आहे, तेव्हां धर्म संरक्षणाचा बोजा आपचा आपल्यावर पडतो; यास्तव अशा महत्वाच्या कामीं ज्यांची योजना व्हावयाची ते जितके उत्तम गुणी असतील तितका धर्माचा उत्कर्ष होणार आहे, म्हणून ही गोष्ट धर्म संस्थानच्या प्रमुख मंडळीनें पक्की ध्यानांत धरिली पाहिजे. म्हणजे लोक समाजामध्यें क-

धींही अश्रद्धा उत्पन्न न होतां धर्म बंधन दृढ राहील व तेणें करून सर्वांचें ऐहिक व पारत्रिक कल्याण होईल. या बंधनाचे जोरावर आजपर्यंत पुष्कळ राष्ट्रांचा अभ्युदय झाला आहे हें सर्व सूज्ञ जाणतच आहेत! स्वराज्य जाऊन प्रथमच जेव्हां इकडे इंग्रजी भाषेचा फैलाव झाला, तेव्हांच्या मंडळीचीं जीं धर्माबद्दल मतें झालीं होतीं तीं आतां पालटत चाललीं आहेत. त्यावेळीं आपलें तें कांहीं उपयोगी नाहीं. "सब सूट" आहे असें मानून कित्येकांनीं धर्मांतर केलें, कित्येकांनीं वेद-

* धर्माध्यक्षाचें काम किती जोखमीचें आहे व तें चालवितांना किती अडचणी येतात हें एका पाश्चात्य ग्रंथकारानें धर्माध्यक्षांचे तोंडांतूनच एके ठिकाणीं वदविलें आहे.

"आमचा हाच मुख्य उद्योग आहे हें खरें पण आम्ही तरी नेहमी त्याप्रमाणें वागतों काय? जर आम्हीं आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविलें नाहीं, तर अनेक उद्योग धंदे असल्यामुळें ज्याचें लक्ष्य पुष्कळ गोष्टीकडे लागलेलें असतें. अशा इतर मनुष्यापेक्षां आम्हीं किती अधिक अपराधी आहों! आपणावर केवढें भयंकर जोखीम आहे, हें ठाऊक असून जर आम्हीं आपल्या शिष्य वर्गास सन्मार्गास लावावयाचे उपाय योजिले नाहींत किंवा भलभलतेच शास्त्रार्थ सांगून आणि पाहिजे तसें आचरण करून दुर्मार्गास लाविलें तर आम्हांस किती दुःख होईल?

*** आणि असा कोणता गुरु आहे कीं त्याच्या अंगीं कोणताही दुर्गुण नाहीं? तथापि इतकें सांगतों कीं, ** मनुष्याचें लक्ष्य दुसऱ्याच्या दोषाकडे नेहमीच असतें, तथापि आम्हाकडे त्यांची विशेष

शास्त्रादिकांचा चुथडा उडविला. कित्येकांनीं नवीन धर्म काढण्याची खटपट केली. सारांश अशा गोंधळामध्यें नवीन मंडळींचीं मतें असल्यामुळें कोणी इकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. पण हल्लीं तसें नाहीं. प्रस्तुत सर्वांचें लक्ष प्रायः आपल्यामूळच्या गोष्टीकडे वळलेलें आहे व या संस्थानचा अधिकार धर्म संबंधानें फार मोठा आहे. याकरितां अधुनिक मंडळींची श्रद्धा स्वधर्मीं दृढ झाली असतां जे महत्फल प्राप्त होईल तें अवर्णनीय आहे. तें आमच्या देशाला निरंतर मिळावें अशी परमेश्वराची प्रार्थनाकरून वाचकाची रजा घेतों.

---

(मा. टी.) दृष्टी असते. यामुळें आमच्या आचरणांत अणुमात्र भेद दिसला, किंवा आम्हामध्यें तिळप्राय व्यंग दिसलें म्हणजे लोक निष्ठुरपणें आमची फारच निंदा आणी उपहास करितात." दि. ब. १६

# नक्का सन १२९६ फसली सालचे कागदांवरून श्री

| अनुक्रम नंबर. | गांवाचें नांव. | कोणाकडून इनाम. | जमिनीचें क्षेत्रफळ. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मौजे संकेश्वर... | बादशाहा...... | ३१६९ |
| २ | हिटणी क० नूल. | बादशाही सनद जलूशीर व महाराज सरकारची सनदें. | १४४४ ७ |
| ३ | कळवीकट्टे ... | महाराज सरकार ..... | १८५७ ३९ |
| ४ | हेळेवाडी क० नेसरी. | शिंदे ......... | २८२ १६ |
| ५ | घाटगी त० आजरें. | हिमत बहादर .... | ३३६५ २३ |
| ६ | रूपेवाडी. ,, | महाराज सरकार... | ६२१ २३ |
| ७ | बारवें क० कापशी | ,, ...... | १५७२ |
| ८ | हेळेवाडी ,, | सेनापति कापशीकर.. | ४११ |
| ९ | हळदी ..... | महाराज सरकार... | १२१२ ७ |
| १० | बलोली .... | हिंदुराव घोरपडे मलकतमदार. | २५९२ १४ |
| ११ | मंटूर ..... | महाराज सरकार... | ३१२४ २१ |
| १२ | खेबचडे .... | ,, ...... | १९६३ ३८ |
| १३ | वाळकी .... | सेनापति कापशी.. | २९३२ ३४ |
| १४ | रिवद्रापूर ... | महाराज सरकार .. | ७५७ २७ |
| १५ | दारवाड ... | ,, ...... | ७१३ २१ |
| १६ | कमतनूर... | ,, ...... | २३४५ ५ |
| १७ | अंकलें .... | बादशाहा .... | ११४९ ८ |
| १८ | वाहानूर .... | महाराज सरकार.. | १११० ० |
| १९ | हतनूर .. | ,, | ७९२८७ ० |

## संस्थान मठ करवीर व संकेश्वरचें क्षेत्रफळ व उत्पन्नाबद्दल.

| जमाबंदी आकार. | शेरा. |
| --- | --- |
| ५ | ६ |
| ५९८३।४।३ | (१) कित्येक गांव इतर सरदार इनामदार |
| ३४८६।१०।४ | वगैरे कडून मिळाले आहेत, पण नजराणा |
| ११३६।७।४ | इत्यादि संबंधानें जे हल्ली करवीर सरका- |
| १६७।१४।२ | रांत मोडतात, ते त्याच सरकारांतून असें |
| १०४५।१।५ | धरिले आहेत. |
| ८३८।१०।८ | (२) सुतकट्टे वगैरे ५ गांव संस्थानाक- |
| ११२६।१२।७ | डून इतराकडे आहेत, त्याविषयीं मागे- |
| ४३७।१५।११ | लिहिलेंच आहे. |
| १८५५।१०।१० | (३) निपनाळ, गांवनाळ व बम्बिवागी |
| २५७०।३।४ | निमा हे तहांह्यात ठरून पुढें अप्पा दी- |
| १२५२।३।१० | क्षित स्वामींचे कारकीर्दीचे अखेरीस खा- |
| २६०३।१३।९ | लसा झालें. |
| २६२७।१०।८ | (४) याशिवाय हत्राट, जालीकट्टी, |
| १५८१।२ | जिवापूर, दंडापूर, हल्लीहाळ (परशुराम- |
| २०१०।१२।४ | भाउ तासगांवकर यांजकडून ) जगबाळ, |
| २६२०।१४।९ | रायपूर, मस्तिहल्ली, जालीकट्टे, गुडन- |
| २१६२।१०।८ | हट्टी, दोडवाड, कोल्लगुड, जरवपाळ, ब- |
| १९२९।१२।४ | डचीवाडी हे १४ गांव संस्थानाकडे दि- |
| ३१७९।५ | ल्याबद्दल सनदापत्रें आहेत. पण राज्य |

## तक्ता सन १२९६ फसली सालचे कागदांवरून श्रीसंस्थान

| अनुक्रम नंबर. | गांवाचें नांव. | कोणाकडून इनाम. | जमिनीचें क्षेत्रफळ. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २० | पोखर्णी .... | थोरात ....... | १२६८।१७।६ |
| २१ | धुळखेड ... | उदाजीराव चवाण ... | ... |
| २२ | कुरगोड .... | रताजीराव चवाण ... | ९६१ |
| २३ | दयनकट्टे .... | कुरुंदवाडकर .... | २१० |
| २४ | आलंटपाल ... | राजे खेमसावंत भोसले संस्थान सुंदरवाडी. | ४७०।२॥ |
| २५ | ओवळिये ... | ,, ....... | २३२१।२७।१५ |
| २६ | कोनोळी ... | संस्थान बावडा ... | ६४।१४।१० |
| २७ | कोळूर .... | राजे कृष्णाप्पा नाईक ... | ... |
| २८ | गड्डे सुडूर ... | ,, ...... | ... |
| २९ | नवलीहाळ ... | जथकर डफळे .... | ... |

४४२२८।१०।३ ही संस्थान तिजोरीस जमा होणारी रकम आहे. संस्थानाकडून पोट इनामें आहेत तीं धरलीं तर एकंदर सुमारे पाऊण लाखाचा वेहडा होईल.

**टीप**- संकेश्वर हा सांख्येश्वर या शब्दाचा अपभ्रंश होय. येथें जो महादेव आहे त्याचें नांव पुराणांतरी "सांख्येश्वर" असें आहे.* या देवाच्या नांवावरूनच गांवालाही सांख्येश्वर असें नांव-

* सिद्धं सांख्येश्वरं लिंगं नैऋत्यां दिशिसंस्थितम्॥ ++ कृष्णा हा नदी यत्र सर्व सर्वोत्तमा [illegible]॥ विघ्नेशो भाधवो ढुंढि दंडपाणिश्च [illegible]॥ तथाकाशी गुहा

## मठ करवीर व संकेश्वरचें क्षेत्रफळ व उत्पन्नाबद्दल.

| जमाबंदी आकार. | शेरा. |
|---|---|
| ५ | ६ |
| ६७६ ८७ ०९ | कानीचे वेळीं त्यांचा नाव मिळाला नाहीं वगैरे |
| १०६५ ०१० ०११ | कारणांवरून प्रस्तुत हे गांव संस्थानाकडे चाल |
| २२८ ०१२ | त नाहींत. |
| २१२ ८४ | ( ५ ) औरवाड व गौरवाड ह्या गांवची वहिव |
| ४१० ०१२८८ | ट या संस्थानाकडे असून उत्पन्न शीवाजीकन |
| ११० | डे चालवें अशीं पत्रें आहेत, पण हल्ली त- |
| ६२७ ८७ ०९ | ची वहिवाट नाहीं. |
| ६०० | ( ६ ) या रेवेरीज कमजान, शेत्या वगैरे |
| ६०० | गांवगन्ना आहेत. |
| २१० | |
| ४४२२८ ०१०८३ | |

पडलें व त्याचा अपभ्रंश "संकेश्वर" असा झाला आहे. हा गांव उ-अ. १६°१२' व पूर्व रे. ७४°३४' या ठिकाणीं समुद्राचे सपाटीपासून १०८० फूट उंचीवर आहे. लोक संख्या ८९५२ आहे. मुख्य उत्पन्न कापूस, गूळ व मिरचीचें आहे. पुराणांत सांख्येश्वर महा-

( मा. टी. ) गंगा भवानी मणि कर्णिका ॥ यत्र नारायणोदेवो नराणां मुक्तिदः परः ॥ पंक्तितीर्थं शुक्ल तीर्थं ब्रह्महत्यानिवारकं ॥ क्षेत्राणामुत्तमं क्षेत्रं काशीतोप्यधिकं ॥ इ. मा. म. म.

त्म्य म्हणून प्रसिद्ध आहे. करवीर क्षेत्राच्या अष्टदिशानां कोपेश्वर, हरीहरेश्वर वगैरे आठ लिंगें आहेत त्यापैकींच सांख्येश्वर (शुद्धात्म तत्वविज्ञानं सांख्य मित्यभिधीयते) हे कल्मष नाशिनी (हिरण्यकेशी, हरणकाशी) नदीचे कांठीं आहे. ही नदी व हिला मिळणारे दोन ओढे (एकाचें नांव गंगा नाला व दुसऱ्याचें नांव गौरी नाला. एक पूर्वेला व एक पश्चिमेला आहे.) यांचें तीर्थत्वानें वर्णन केलें आहे. तसेंच काशीमध्यें जेविश्वेश, माधव इत्यादि देव प्रसिद्ध आहेत, त्याचीच या क्षेत्रांत हीं स्थानें, महात्म्यांत लिहिल्याप्रमाणें दाखवितात. सांख्येश्वराचे देवालयाचे आसमंतात् सुमारें पांचशें पावलें प्रदेशांत प्राण्यास अंतकालीं तारकेश्वराचा उपदेश होत असतो असेंही सांख्येश्वर महात्म्यांत लिहिलें आहे* व त्याप्रमाणें अनुभवही आहे. म्हणजे वरील स्थल सीमेंत कोणी प्राणी मृत झाला असतां त्याचा उजवाच कान वरचे बाजूस असतो, असें येथील रहिवासी सांगतात. येथून सुमारें तीन कोशावर सामानगड म्हणून एक डोंगरी किल्ला आहे. (येथील गडकऱ्यांनीं सन १८४४ चे जुलई महिन्यांत बंड केलें होतें तें इतिहास प्रसिद्ध आहे.) व त्यांत एक मारुतीचें देवालय आहे. त्या डोंगराचा व सदरील मारुतीचा उल्लेख

* यस्मिन्सांख्येश्वरे स्थाने गुरुभूत्वा सदाशिवः ॥ गौरी भोगावती मध्ये मोक्षमार्ग प्रदायकः ॥ तारकं चोप दिशति कर्णे दक्षिणके शुभे ॥ + + श्रीशैलाच्चापि केदारात्प्रयागो मोक्षदः परः ॥ सांख्येश्वरं महाक्षेत्रं तस्मादपि महत्तरम् ॥ दुर्लभं सर्वदेवानां सांख्येश्वर पुरंमहत् ॥ ३१ सा. म. प्र. अ.

सांख्येश्वर महात्म्यांत केला आहे. डोंगराला " सर्षपगिरी " व मा-रुतीला " भीम असें म्हटलें आहे. हल्लीं व्यवहारांत " भीम सास-केरी " असें म्हणतात. येथें महाशिवरात्रिला पांच दिवस यात्रा भ-रते. वरील ठिकाणाबद्दल सदर महात्म्यांत एकेक कथानक आहे. ज्याला विध्युक्त करवीर यात्रा करणें आहे, त्यानें या क्षेत्रास आ-लें पाहिजे असें आहे. हें महात्म्य अगस्ति लोपामुद्रा संवादा-त्मक आहे.

संकेश्वर येथें रथसप्तमीला मोठी यात्रा भरते व रथोत्साह, ब्राम्हण भोजन मोठें होतें. तसाच स्वारीमध्यें श्रावणमासी लिंगा-नुष्ठानाबद्दल व नवरात्राबद्दल मोठें उत्साह होत असतात.

---

## तोटकाचार्यकृतमाचार्यस्तोत्रम्

श्रीः ॥ ततः कदाचित्कलिताधिवासः क्षेत्रेच तत्रैव महो विचित्रे ॥
श्रीविश्वनाथाध्वरिवर्यपुत्रोनाम्ना कलानाथ इति प्रसिद्धः ॥१
समागतं शंकरदेशिकेन्द्रं माकर्ण्य विश्वोन्नतिकीर्तिसान्द्रम्॥
स्तोत्रं पठन् तोटकवृत्तक्लृप्तं तत्पादपद्मं शरणं गतोऽसौ ॥ २॥
विदिताखिलशास्त्रसुधाजलधे महितोपनिषत्कथितार्थनिधे॥
हृदये कलये विमलं चरणं भवशंकरदेशिक मे शरणम् ॥ ३॥
करुणावरुणालय पालय मां भवसागरदुःखविदूनहृदं ॥ र-
चयाखिलदर्शनतत्वविदं भवशंकरदेशि० ॥ ४॥ भवताजन
ता सुहिता भविता निजबोधविचारणचारुमते ॥ कलयेश्वर
जीवविवेकविदं भवशंकर० ॥५॥ भव एव भवानिति मे नितरां
समजायत चेतसि कौतुकिता ॥ मम वारय मोहमहाजलधिं-

भवशंकर०॥ ६॥ सुकृते ऽधिकृते बहुधा भवतो भवितापद्दर्शनलालसता ॥ अतिदीनमिमं परिपालय मां भवशंकर०॥ ७॥ जगतीमवितुं कलिताकृतयो विचरन्ति महामहसश्छलतः॥ अहिमांशुरिवात्र विभासि पुरो भवशंकर०॥ ८॥ गुरुपुंगव पुंगवकेतन ते समतामयतां नहि कोऽपि सुधीः॥ शरणागतवत्सल तत्त्वनिधे भवशंकर देशि०॥ ९॥ विदितानमयाविशदैककला न च किंचन कांचनमस्ति गुरो॥ द्रुतमेव विधेहि कृपां सहजां भवशंकर०॥ १०॥ इत्थं स्तुवन् तच्चरणारविंदसेवामजस्रं रचयांचकार॥ भावं विजानन् समयोचितानि वस्तुन्यतं द्रोप्यनयत्स शीघ्रम् ॥११॥ ॥ इतिश्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीचिद्विलासयतींद्रविज्ञानकंदतपोधनेंद्रसंवादे शंकरविजयविलासत्रयोदशाध्याये तोटकाचार्यकृतं स्तोत्रं संपूर्णम्॥

## अथ सांख्येश्वरकुसुमाञ्जलिः

कौबेरदिग्भागतटे विशंकटे हिरण्यकेशिद्रुमपक्षिसंकटे॥ उमासमेतो वसितुं समाययौ सांख्येश्वरो सांख्यपुरं परेश्वरः॥ १॥ बुभुत्सया बोधपराङ्मुखान्नरान् कृपाकटाक्षे रवलोक्य बाधितान्॥ ग्राहे र्भवाब्धिस्थकलत्रबोधये र्यतं तु शीघ्रं भवबंधमोचने॥ २॥ विवक्षया वेक्षितसिद्धये चिरं पंचाक्षरीमंत्रवरं जपंन्स्थिति॥ निजालया धोगत कंदरे स्थितो नैजानुजीव्यैर्धनुकंपयावृतः॥३॥ रिरक्षया रक्ष्यगणस्य सत्वरं स्वपादपद्माप्तिनौ प्रवृत्तये॥ देवालये दिव्यशिलाविघट्टिते सुखोपविष्टो द्विजवर्यसेवितः॥ ४॥ चिकीर्षया चित्रचरित्रशूलिनः संदेशितस्यारिकरो विनायकः॥ श्रीभैरवो भीरुभयापनोदनो निषेदि-

रे पार्श्वभुवो समीरिताः ॥५॥ विधित्सया वांच्छितभक्तपोष-
णा प्रियोन्मुखापांगविलोकितानना ॥ प्रसाधयेत्तिप्रसभं मुदा-
न्विता मद्भक्तहृद्यं प्रियभाषितस्यच ॥ ६॥ जिघांसया घातुक
दुष्टरक्षसो यतंतमावेक्ष्य समागतोहरम् ॥ निर्वोढुमाज्ञापयतीव
सांविभुर्नंदीश्वरो भ्राग्धुरिपर्युपाविशत् ॥७॥ वाराणसी साम्य
मुपेयुषंवरं सुतीर्थमध्यासितुमागतं शिवम् ॥ प्रसेवितुं सम्य-
गुणागमघतिर्विराजितो विप्रवरैरनाकुलः ॥ ८॥ सांख्येश्वर
स्यागमनस्य वर्णनं पठंतिये पार्श्वमुपाश्रिता नराः ॥ तेभ्यः प्रसीद
त्यखिलार्थदोमृडो मोक्षार्थिनोप्याशु विशंति निर्वृतिं ॥ ९ ॥ इ-
तिश्रीमत्परम० श्रीमत्कृष्णानंद सरस्वती शिष्य निजानंद वि-
रचिता सांख्येश्वर कुसुमांजलिः समाप्ता ॥ ॥ ॥

श्रीः ( पत्र २१ पहा. )

कृष्णातटेऽतिविमले सुरसिद्धविप्रै राम्नायगीतनिकरैरभि
संस्तुतोयः ॥ दक्षाध्वरस्य हरणे धृतकोपवेषः कोपेश्वरो विज
यतेऽखिललोकनाथः ॥१॥ "खिद्रापुरे" पुरवरे किजभृत्य
वर्गैर्भिद्रासनेऽतिविशदे परिपूजितोयः ॥ उन्भिद्रतालपणा-
वानकगोमुखाद्यैः संगीतवाद्यनिकरैर्ध्वनिपूर्णनादैः ॥ अंतर्गृहे
सुविमले परितो विशाले तद्भिति भूमिपरिनिर्मितचित्रजाले ॥
तन्मध्यगर्भसुविराजित "दोपदेवे" देवाधिदेव रुचिरोचित
मध्यशाले ॥३॥ स्तंभैर्विचित्रसुरविग्रहकूप्तमध्यैर्वैमानिका
श्रितविमाननिभैर्निरूढैः ॥ शालैर्विशालमृगपक्षिजनावकी
र्णैरालीढितैः कुशलशिल्पकलावितर्कैः ॥ ४॥ द्वारैर्विरा-
जितविशाललतालताग्रमत्युग्र सूर्यशशिविग्रहचित्ररेखैः॥

तत्पाद्र्वभागगतदेवकरारविंदविद्योतचामरयुगैःसुरूपःटगु-
कैः॥तद्दाह्यभागदृढभित्युपलाग्रसीमासंसक्तवाजिगजगो
हरिरूढकायैः॥देवैःस्वसंघरचितेभुवनैकरम्यदेवालयेत्य-
जतिकोपमहोसुरेशः॥६॥ यद्दाह्यभित्युपलमध्यगतांगना-
नांदृष्टीषुविद्धहृदयाःपुरुषाःप्रहृष्टाः॥वक्त्रेंदुदर्शनविका-
सितनेत्रपद्माःसंभ्रांतिसंभृतधियःपरितोविरेजुः॥ ७॥य-
त्पूर्वभागगतनिर्वृतिमंटपस्यमध्यावकाशगतपुत्तलिकाःसु-
कायाः॥इंद्रादिदेवनिचयाःपरिरूढयानाःसंदर्शनायपरि
वव्रुरिवावनम्राः॥८॥ कोपेश्वरालयचमत्कृतिरुत्तमेयंसं-
वर्णितेशकृपयेशसुतोषणाय॥योवैपठत्यनिशमर्थसुचिंत-
नेन तस्मैप्रसीदतिसुरेश्वरकोपनाथः॥९॥ इतिश्रीमत्परमहं-
स० श्रीमत्कृष्णानंद सरस्वती शिष्य निजानंद विरचिताको-
पेश्वरालयचमत्कृतिःसमाप्ता॥ ॥ छ्॥ ॥

समाप्त.

अदृष्टदोषान्मतिविभ्रमाद्वान्यूनाधिकंयल्लिखितंमयात्र॥त-
त्सर्वमार्यैःपरिशोधनीयंकोपेनकार्यःखलुमाद्दशोपरि॥

**सूचना**- हीं पुस्तकें ज्या कोणास पाहिजे असतील त्यांस कर्त्याकडे किंवा कोल्हापूर येथें **ज्ञानसागर** छापखान्यांत विकत मिळतील- बाहेरगांवचे ग्राहकांनीं टपालखर्च सुद्धां रोख पैसा पाठवून किंवा "व्हाल्युपेबल् पार्सलनें" मागवावी- पत्रव्यवहार पोष्टपेड करावा- आलीकडे पुस्तकाबद्दल, वर्तमानपत्रांबद्दल वगैरे जाहिराती अगोदर देऊन वर्गणी गोळा करावयाची आणि मग वर्गणीदारांस कांहीं तरी सबबी सांगत बसावयाचें, अशी भास चोहोंकडे पडत चालली आहे, यामुळें ग्राहक साशंक असतात; म्हणून आम्ही तसा कांहीं जाहिरातींना वगैरे उद्योग केला नाहीं- तथापि असलीं कामें सर्वथा लोकाश्रयावरच अवलंबून असतात, हें जाणून सर्व जिज्ञासु, धर्माभिमानी व उदार लोक आपला पूर्ण आश्रय देतील अशी उमेद आहे- सुज्ञास विशेष काय सुचवावें? "आकारैरेव चतुरास्तर्कयंति परेंगितम्"

पुस्तककर्ता.